दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
अहिल्यानगर। पुणे। छत्रपती संभाजीनगर। बीड। धाराशिव। नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले । RNI NO.MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रु. ४.००। अंक २८१। शनिवार, दि.२५ जुलै २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Sahyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com




## महत्वाचे...

### १५ ऑगस्टपासून १० किलोचा सिलिंडर मिळणार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** देशातील २४ राज्यांमधील १०० शहरांमध्ये राहणाऱ्या नागरिकांसाठी एक मोठी आणि दिलासादायक बातमी आहे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड या सरकारी तेल कंपनीने या शहरांमध्ये १० किलो वजनाचा एलपीजी सिलिंडर उपलब्ध करून देण्याची घोषणा केली आहे. येत्या १५ ऑगस्टपर्यंत या निर्णयाची अंमलबजावणी होईल. बीपीसीएलने जूनच्या तिमाहीत कच्च्या तेलाच्या पुरवठ्यासाठी नवीन स्रोतांवर विशेष भर दिला आहे. कंपनीने आपल्या एकूण खरेदीपैकी ३८ टक्के कच्चे तेल एकट्या रशियाकडून खरेदी केले आहे. स्पॉट मार्केटमधून तेलाची खरेदी वाढवून ६९ टक्क्यांवर नेण्यात आली आहे. तर रशियाव्यतिरिक्त कंपनीने व्हेनेझुएला आणि अंगोला या देशांकडूनही कच्च्या तेलाची आयात वाढवली आहे. सध्या इझउडकडे ३.८ दशलक्ष टन (३८ लाख टन) कच्च्या तेलाचा साठा उपलब्ध आहे, जो पुढील ३५ दिवसांची गरज पूर्ण करण्यासाठी पुरेसा आहे. जूनच्या तिमाहीत बीपीसीएलचा एकूण महसूल सुमारे १.५१ लाख कोटी रुपये इतका राहिला आहे. या कालावधीत कंपनीला ३,९६२ कोटी रुपयांचा

(उर्वरीत पान ४ वर)

# पेपरफुटीतील दोषींना १० वर्षांचा तुरुंगवास, १० कोटींचा दंड

## मोदी मंत्रिमंडळाची विधेयकाला मंजुरी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळाने पेपरफुटी सुधारणा विधेयकाला मंजुरी दिली आहे. जंतर मंतर येथे विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान शुक्रवारी झालेल्या बैठकीत या विधेयकाला मंजुरी देण्यात आली. या विधेयकानुसार, पेपरफुटीसाठी दोषी आढळलेल्यांना १० वर्षांच्या तुरुंगवासाची आणि १० कोटी रुपयांच्या दंडाची तरतूद आहे. सुधारणा विधेयकात पेपरफुटी माफियांच्या विरोधात कठोर तरतुदी आहेत.

जलदगती न्यायालयांनी तीन महिन्यांच्या आत निकाल देणे बंधनकारक आहे. या विधेयकात दोषी आढळलेल्यांना १० वर्षांपर्यंतच्या शिक्षेची आणि १० कोटी रुपयांच्या दंडाची तरतूद आहे. केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह सोमवारी संसदेत हे विधेयक सादर करतील. प्रश्नपत्रिका फुटणे आणि कॉपी करण्याविरोधातील सध्याचा कायदा 'सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकारांना प्रतिबंध) कायदा, २०२४' आहे. सरकार तो अधिक कठोर करत आहे.

सध्या, वैयक्तिक प्रकरणांमध्ये तीन ते पाच वर्षांची शिक्षा आणि १० लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. सेवा पुरवठादारांना १० लाख रुपयांपर्यंतच्या दंडाला सामोरे जावे लागते. संघटित गुन्ह्यांसाठी पाच ते दहा वर्षांची शिक्षा आणि किमान १० लाख रुपयांचा दंड आहे. विद्यमान कायद्यात एक अतिरिक्त तरतूद जोडली जाईल, ज्यामुळे अशा प्रकरणांसाठी जलदगती न्यायालये अनिवार्य होतील.

विविध स्तरांवर दंडाची तरतूद केली जाईल. विद्यमान कायद्यात आवश्यक दुरुस्त्या/अद्ययावतीकरणे केली जातील. या विधेयकासाठी कार्मिक आणि प्रशिक्षण विभाग हे नोडल मंत्रालय असेल. गुरुवारी सकाळी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घोषणा केली की, प्रश्नपत्रिका फुटीविरोधात अधिक कठोर तरतुदी असलेले विधेयक पुढील आठवड्यात संसदेत सादर केले जाईल.

(उर्वरीत पान ४ वर)

### धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनामावर आज निर्णय

**सीजेपीच्या शिष्टमंडळाची केंद्र सरकारच्या प्रतिनिधींशी शुक्रवारी बैठक पार पडली. या बैठकीत सीजेपीच्या तीनपैकी दोन मागण्यांबाबत सरकारने सकारात्मक भूमिका घेतली आहे. बैठकीनंतर सीजेपीचे प्रवक्ते आशुतोष रंका यांनी सांगितले की, संघटनेने सरकारसमोर तीन प्रमुख मागण्या मांडल्या होत्या. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, नीट परीक्षेशी संबंधित घटनांमुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना एक कोटी रुपयांची आर्थिक मदत द्यावी आणि आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांवरील एफआयआर तसेच अन्य कायदेशीर कारवाई मागे घ्यावी, अशी त्यांची मागणी होती. विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत आणि आंदोलनादरम्यान दाखल करण्यात आलेले एफआयआर मागे घेण्याबाबत सरकारने सकारात्मक संकेत दिल्याचे रंका यांनी स्पष्ट केले. मात्र, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याबाबत अंतिम निर्णय घेण्यासाठी सरकारने आज शनिवारी दुपारी २ वाजेपर्यंतचा अवधी मागितला आहे.**

## २६ दिवसांनंतर सोनम वांगचुक यांचे उपोषण मागे



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** नीट पेपरफुटी प्रकरणातील दोषींविरुद्ध आंदोलन करणाऱ्या सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी जवळपास २६ दिवसांनंतर आपले उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेतला. मध्यरात्री १.३० वाजता केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा आणि केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर सोनम वांगचुक यांनी उपोषण थांबवण्याचा निर्णय जाहीर केला. उपोषण थांबवण्याची माहिती स्वत: सोनम वांगचुक यांनी एक्सवर पोस्ट करत दिली.

एकीकडे सोनम वांगचुक यांनी उपोषण मागे घेतलं असलं तरी दुसरीकडे कॉकरोच जनता पार्टी अजूनही आंदोलनावर ठाम आहेत. सोनम वांगचुक यांनी उपोषण मागे घेतल्यानंतर कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी प्रतिक्रिया दिली. २६ दिवसांच्या उपोषणानंतर सोनम वांगचुक यांनी उपोषण मागे घेतल्याने आम्हाला मोठा दिलासा मिळाला असून आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभारी आहोत. सोनम सर, आपल्या असामान्य धैर्याला आणि त्यागाला मनापासून सलाम. स्वतःचा जीव धोक्यात घालून आपण संपूर्ण देशाच्या विवेकाला जागृत केले. आपले जीवन या देशासाठी अत्यंत मौल्यवान आहे, असं अभिजीत दीपके म्हणाले. तसेच कॉकरोच जनता पार्टीचे जंतर-मंतर येथे सुरू असलेले शांततापूर्ण आंदोलन केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा देईपर्यंत सुरूच राहणार आहे,

(उर्वरीत पान ४ वर)

# पांडुरंग पावला... भंडारदरा ओव्हरफ्लो!

## प्रवरा नदीपात्रात २० हजार ११० क्युसेक विसर्ग सुरु

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्याच्या उत्तर भागाची जीवनरेखा असणारे भंडारदरा धरण अखेर 'ओव्हरफ्लो' झाले. जलाशय परिचलन सूचीप्रमाणे या महिन्यात धरण शंभर टक्के भरू दिले जात नाही. त्यामुळे धरणातील पाणीपातळी तसेच पाणीसाठा नियंत्रित ठेवण्यासाठी गुरवारपासून धरणातून विसर्ग सुरू करण्यात आला आहे. शुक्रवारी दुपारी धरणातून तब्बल २० हजार ११० क्युसेक विसर्ग प्रवरा नदीपात्रात सुरू होता. सायंकाळी तो १४ हजार १८२ क्युसेकपर्यंत कमी करण्यात आला. तेव्हा धरणातील पाणी साठा १० हजार १०० दलघफू (९१.४९ टक्के) होता. पाणलोटातील पावसाचे प्रमाण जसे कमी जास्त होईल तसा विसर्ग कमी जास्त केला जातो.

उत्तर नगर जिल्ह्यात भंडारदरा धरण भरणे हा एक आनंद सोहळा असतो. वैशाख संपता संपता कृष्णमेघ भंडारदऱ्याच्या सामन्यात गर्दी करू लागतात. वाहणारा सोसाट्याचा वारा मान्सूनच्या आगमनाची वर्दी देत असतो. साऱ्या लाभक्षेत्राचे लक्ष भंडारदऱ्यातील त्याच्या आगमनाकडे लागलेले असते. अखेर कळसूबाई, रतनगडाच्या डोंगर रांगात मान्सूनच्या सरी बरसु लागतात. कधी तो मुसळधार कोसळतो तर कधी ओढ देतो. मिलिमीटर, टीएमसी, दशलक्ष घनफूट अशा आकड्यांची आणि पंचवीस टक्के, पन्नास, नव्वद टक्के आणि धरण भरल्याची वार्ता येते. लाभक्षेत्रात उत्साहाची लहर पसरते. भरलेला भंडारदरा पहायला लोक गर्दी करतात.

आशा निराशेचा हा खेळ या वर्षीही अनुभवला गेला. मान्सूनचे उशिरा झालेले आगमन ,नंतर काही दिवस पावसाचे मुसळधार कोसळणे, नंतर अचानक गायब होणे, त्यामुळे पावसात पडलेला मोठा खंड आणि आठवडाभरापूर्वी झालेले त्याचे पुनरागमन, धोधो कोसळणे आणि अखेर तो क्षण आला. धरणाची महाकाय दारे वर उचलली गेली. काळ्याशार भिंतीने अडविलेले अमृतवाहिनीचे पाणी आवेगाने धरणातून बाहेर झेपावले. उड्या घेत, खळाळत प्रवरा पात्रात पोहचले.

मागील काही दिवसांपासून भंडारदरा पाणलोट क्षेत्रात अतिवृष्टी सुरू आहे. तीन दिवसांपासून धरणाच्या पाणी साठ्यात सरासरी दहा टक्क्यांनी वाढ सुरू आहे. त्यामुळे जलसाठ्यात झपाट्याने वाढ होत गेली. काल सकाळपासूनच जलाशयातील पाण्याच्या लाटा वाऱ्याच्या झोताबरोबर सांडव्याच्या भीतीवरून बाहेर झेपावत होत्या.

(उर्वरीत पान ४ वर)

### विक्रमी पाऊस

**धरणात पाणी येण्यास सुरुवात झाल्यापासून आज सकाळपर्यंत ८ हजार १२८ दलघफू नवीन पाणी धरणात जमा झाले आहे. भंडारदरा पाणलोट क्षेत्रात आज पडलेला, कंसात आजपर्यंतचा एकूण पाऊस मिमीमध्ये, पुढील प्रमाणे आहे. घाटघर २२० ( २ हजार ५६०), रतनवाडी २०६ (२ हजार ५३), पांजरे २०३ (१ हजार ६५१), भंडारदरा १८२ (१ हजार ३९४), वाकी १६१ (१ हजार १८९).**

### आता लक्ष निळवंडेकडे

**दि. ७ जुलैला घाटघर येथे ३२१ मिमी पावसाची नोंद झाली. पाणलोट क्षेत्रात चोवीस तासात आजपर्यंत पडलेला तो सर्वाधिक पाऊस होय. भंडारदरा जलाशयात आज चोवीस तासांतील सर्वाधिक म्हणजे १ हजार २६६ दलघफु पाण्याची आवक झाली. लाभ क्षेत्राचे लक्ष आता निळवंडे कधी भरते याकडे लागले आहे.**



## मंत्री राधाकृष्ण विखेंच्या बदनामीप्रकरणी एकावर गुन्हा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी / लोणी :** राज्याचे जलसंपदा तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचा आवाज मॉर्फ करून तयार करण्यात आलेला बनावट ऑडिओ आणि व्हिडिओ सोशल मीडियावर पसरवल्याप्रकरणी मोठी कारवाई करण्यात आली. लोकांमध्ये संभ्रम निर्माण करून मंत्र्यांची बदनामी केल्याप्रकरणी लोणी पोलिसांत अनिल नानासाहेब विखे ( रा. लोणी, ता. राहाता) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून निमगाव जाळी (ता. संगमनेर) येथील गणेश मारुती डेंगळे यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.सदरची २४ जुलै रोजी समोर आली.



आरोपी गणेश डोंगळे

याबाबत अनिल विखे फिर्यादीत म्हटले आहे की,आरोपी गणेश डेंगळे याने आपल्या इन्स्टाग्राम खात्यावर मंत्री विखे पाटील यांच्यासंदर्भात समाजात गैरसमज पसरविणारे आणि त्यांच्या चारित्र्यास हानी पोहोचविणारे गंभीर आरोप केले.ही पोस्ट मंत्र्यांच्या राजकीय विरोधकांशी संगनमत करून तयार करण्यात आली होती.



(उर्वरीत पान ४ वर)

# बेलवंडी ग्रामपंचायतीचा काळा कारभार उघड !

- चौकशीत १६ लाखांचा कथित अपहार
- सरपंचांसह संबंधितांना कारणे दाखवा नोटिसा

दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी बुद्रुक ग्रामपंचायतीतील आर्थिक गैरव्यवहाराचा अखेर भांडाफोड झाला असून, चौकशी अहवालात तब्बल १६ लाख पेक्षा अधिक रकमेचा कथित अपहार आणि आर्थिक अनियमितता प्राथमिकदृष्ट्या निदर्शनास आली आहे.या गंभीर निष्कर्षांनंतर संबंधित सरपंच ऋषिकेश शेलार यांच्यासह जबाबदार पदाधिकाऱ्यांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ च्या कलम ३९(१) अंतर्गत 'कारणे दाखवा' नोटिसा बजावण्यात आल्याने तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी तील सामाजिक कार्यकर्ते नितीन रासकर, दीपक कोद्रे, अमोल काळाणे, निखिल हिरवे, प्रवीण चोभे व आकाश पुराणे यांनी प्रशासनाकडे पुराव्यांसह केलेल्या तक्रारीची दखल घेत प्रशासनाने विशेष चौकशी समिती नेमली होती.त्याच्या चौकशी अधिकारी म्हणून विस्तार अधिकारी सारिका हराळ यांची निवड करण्यात आली होती. त्यांनी याबाबत मागील काही दिवसापूर्वी जिल्हा परिषदेला अहवाल सादर केला होता. त्यामध्ये समितीने ग्रामपंचायतीचे अभिलेख, बँक व्यवहार, खर्चाची बिले, मोजमाप पुस्तके (एम.बी.), विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी आणि इतर कागदपत्रांची पडताळणी केली.यामध्ये चौकशीत प्रत्यक्ष काम न करता खर्च दाखवणे, बोगस बिले सादर करणे, एकाच स्वरूपाच्या साहित्यावर वारंवार खर्च दाखवणे, चेकऐवजी मोठ्या प्रमाणात रोख व्यवहार करणे, निविदा प्रक्रियेतील त्रुटी आणि आर्थिक नियमांचे उल्लंघन झाल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. चौकशी अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या अहवालाच्या आधारे सरपंच ऋषिकेश शेलार यांच्यासह ग्रामसेवक यांच्यासह संबंधित पदाधिकाऱ्यांना कलम ३९(१) अंतर्गत नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

या कलमानुसार कर्तव्यात कसूर, भ्रष्टाचार अथवा शासकीय निधीच्या गैरवापराबाबत दोष सिद्ध झाल्यास संबंधितांना पदावरून हटविण्याची तरतूद आहे. संबंधितांना खुलासा सादर करण्यासाठी मुदत देण्यात आली असून, त्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.या कारवाईमुळे ग्रामपंचायतींच्या निधीच्या वापराबाबत प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचा संदेश गेला असून, तालुक्यातील इतर ग्रामपंचायतींच्या आर्थिक व्यवहारांचीही तपासणी होण्याची चर्चा सुरू झाली आहे.त्यामुळे अनेकांची चांगलीच धांदल उडाल्याचे चित्र पाहण्यास मिळत आहे.

### चौकशीतील ठळक निरीक्षणे

**१६.लाखांहून अधिक रकमेच्या कथित आर्थिक अनियमितता.बोगस बिले आणि प्रत्यक्ष कामाशिवाय खर्च दाखवल्याचा ठपका.**
**अनेक खर्चांमध्ये चेक पेमेंट नाही, हातउसने/रोख व्यवहार अशी नोंद.**
**आर्थिक नियम, निविदा प्रक्रिया आणि लेखा पद्धतीतील गंभीर त्रुटी.**
**चौकशी अहवालानंतर संबंधितांवर कलम ३९(१) अंतर्गत नोटिसा. देण्यात आल्या आहेत.**

### माहिती देण्यास टाळाटाळ

**याबाबत माहिती घेण्यासाठी विस्तार अधिकारी तसेच चौकशी अधिकारी सारिका हराळ यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले चौकशी चालू आहे चौकशी पूर्ण झाल्यावर याबाबत वरिष्ठ अधिकारी आपल्याला माहिती देतील असे सांगून त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे त्यामुळे यामागचे नेमके काय गौडबंगाल आहे याचाही प्रशासनाने शोध घेण्याची गरज निर्माण झाली आहे.**

## अहिल्यानगरमध्ये पुन्हा एमडी ड्रग्स पकडले

### कारसह १० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :**चार दिवसापूर्वीच अहिल्यानगरच्या तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत एमडी ड्रग्स अमली पदार्थाची कारवाई ताजी असतानाच नगरच्या एमआयडीसी परिसरात पोलिसांनी एमडी ड्रग्स २७ ग्रॅम पावडर पकडली. यावेळी पोलिसांनी एकाला पकडले असून दुसरा फरार झाला आहे. या कारवाईत पोलिसांनी एका कारसह सुमारे १० लाखाचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. एकापाठोपाठ एक अहिल्यानगर परिसरात अमली पदार्थ आढळून येत असल्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, विना क्रमांकाची एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस पथक एमआयडीसी परिसरातील निंबळक शिवारात पेट्रोलिंग करत असताना यांना समोरून विनाक्रमांकाची कार त्यांना येताना दिसली. पोलीस पथकाने सदरची कार थांबवली. त्यावेळी वाहनातील एक जण पसार झाला तर दुसरा पोलिसांच्या हाती लागला आहे. त्याच्या खिशात २७ ग्रॅम वजनाची एमडी ड्रग्स पावडर आढळून आली. यावेळी पोलिसांनी विना क्रमांकाची कार व एमडी ड्रग्स अमली पदार्थ असा एकूण १० लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा अधिक तपास एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करत आहेत. यामागे एखादे मोठे रॅकेट असावे असा पोलिसांचा संशय आहे त्या दृष्टीने पोलीस तपास करीत आहेत.



## कोथुळमध्ये शेतात गांजाची लागवड साडेसात लाखांचा मुद्देमाल जप्त

### एकास अटक

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** अहिल्यानगर जिल्ह्यातील अंमली पदार्थांविरोधातील मोहिमेला वेग देत स्थानिक गुन्हे शाखेने श्रीगोंदा तालुक्यातील कोथुळ येथे मोठी कारवाई केली. घरासमोरील शेतात कडवळाच्या पिकामध्ये गांजाची लागवड केल्याप्रकरणी दिलीप गंगाधर लाटे (वय ७५, रा. कोथुळ) याला अटक करण्यात आली. आरोपीकडून ३७ किलो १९० ग्रॅम वजनाचा, सुमारे ७ लाख ४३ हजार ८०० रुपयांचा गांजा जप्त करण्यात आला. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या नशामुक्त भारत अभियानांतर्गत अंमली पदार्थांविरोधातील विशेष मोहिमेदरम्यान स्थानिक गुन्हे शाखेला गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने बेलवंडी पोलिसांच्या मदतीने कोथुळ येथे छापा टाकला.पंचांसमक्ष केलेल्या पाहणीत घरासमोरील शेतातील कडवळाच्या पिकामध्ये गांजाची झाडे आढळून आली. चौकशीदरम्यान आरोपीने ही झाडे स्वतः नशा करण्यासाठी लावल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर गांजाची झाडे जप्त करून आरोपीला ताब्यात घेण्यात आले.याप्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायदा, १९८५ मधील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास बेलवंडी पोलीस करीत आहेत.पोलीस प्रशासनाने शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, गांजा, अफू (खसखस) यांसारख्या प्रतिबंधित अंमली पिकांची लागवड करणे हा कायद्याने गुन्हा आहे. अशा प्रकारची लागवड आढळल्यास किंवा माहिती मिळाल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याला किंवा स्थानिक गुन्हे शाखेला कळवावे. तसेच कृषी विभागानेही शेतकऱ्यांमध्ये याबाबत जनजागृती करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# राष्ट्रवादीचे विलीनीकरण : महाराष्ट्राच्या राजकारणातील नवा अध्याय..?

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

महाराष्ट्राच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य विलीनीकरणाची चर्चा पुन्हा एकदा केंद्रस्थानी आली आहे. शरद पवार आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील दोन गट पुन्हा एकत्र येणार का, हा प्रश्न केवळ एका पक्षाच्या भवितव्यापुरता मर्यादित नाही; तर तो राज्याच्या आगामी राजकीय समीकरणांवर दूरगामी परिणाम करणारा ठरू शकतो. मात्र, विलीनीकरणाची चर्चा जितकी वेगाने पुढे जात आहे, तितकाच नेतृत्वाचा प्रश्न त्यात अडसर ठरताना दिसतो.

राष्ट्रवादी काँग्रेसमधील फूट ही केवळ संघटनात्मक नव्हती; ती नेतृत्व, विश्वास आणि राजकीय भूमिकांमधील मतभेदांची परिणती होती. त्यामुळे आता पुन्हा एकत्र येण्याची प्रक्रिया ही केवळ औपचारिक विलीनीकरणाची नसून, ती राजकीय विश्वासार्हतेची मोठी परीक्षा आहे. कोणाच्या नेतृत्वाखाली पक्ष चालणार, निर्णय प्रक्रियेत कोणाचे वर्चस्व राहणार आणि भविष्यातील राजकीय दिशा काय असेल, या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळाल्याशिवाय एकत्रीकरणाला पूर्णविराम मिळणे कठीण आहे.

अजित पवार यांनी सत्तेत सहभागी होऊन प्रशासनात आपले स्थान मजबूत केले आहे. दुसरीकडे, शरद पवार यांचे व्यक्तिमत्त्व अजूनही राष्ट्रवादीच्या मूळ विचारांचे आणि संघटनात्मक परंपरेचे प्रतीक मानले जाते. त्यामुळे या दोन प्रवाहांना एकाच चौकटीत आणताना नेतृत्वाचा संघर्ष अपरिहार्य ठरतो. हा संघर्ष व्यक्तींचा असला, तरी त्यामागे कार्यकर्त्यांच्या भावना, स्थानिक नेतृत्वाची समीकरणे आणि भविष्यातील राजकीय वारशाचाही प्रश्न दडलेला आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतंत्रपणे कोणत्याही नव्या पक्षाला राष्ट्रीय लोकशाही आघाडीत (छूअ) प्रवेश न देण्याची भूमिका घेतल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. जर ही भूमिका वस्तुस्थिती असेल, तर दोन्ही राष्ट्रवादी गटांसमोर विलीनीकरणाशिवाय पर्याय उरत नाही. याचा अर्थ, विलीनीकरणाचा निर्णय हा केवळ भावनिक किंवा वैचारिक नसून सत्तेच्या राजकारणाशी निगडित आहे. भारतीय राजकारणात विचारसरणीपेक्षा सत्तेची गणिते अनेकदा निर्णायक ठरतात, याची ही आणखी एक आठवण म्हणावी लागेल.

या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री निवासस्थानी झालेल्या विविध बैठका आणि वरिष्ठ नेत्यांमधील चर्चांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. अशा भेटी राजकारणात नवीन नाहीत; परंतु त्यातून निर्माण होणारे संकेत अनेकदा पुढील मोठ्या निर्णयांचे सूचक ठरतात. त्यामुळे पडद्यामागे सुरू असलेल्या हालचालींकडे राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे.

याच काळात शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घेतलेली भेट चर्चेचा नवा विषय ठरली आहे. भारतीय राजकारणात संवाद हा लोकशाहीचा भाग असला, तरी अशा उच्चस्तरीय भेटींना राजकीय अर्थ प्राप्त होणे स्वाभाविक असते. विशेषतः लोकसभा मतदारसंघ फेररचनेसारख्या महत्त्वाच्या विषयावर चर्चा सुरू असताना आणि छूअ प्रवेशाच्या शक्यता व्यक्त होत असताना या भेटीकडे विविध राजकीय चष्म्यातून पाहिले जात आहे. मात्र, केवळ एका भेटीच्या आधारावर अंतिम निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. राजकारणात अनेक भेटी औपचारिक असतात, तर काही भविष्यातील राजकीय घडामोडींची नांदी ठरतात. त्यामुळे संयमाने पुढील घटनांची वाट पाहणे अधिक उचित ठरेल.

आज महाराष्ट्रातील मतदार पूर्वीपेक्षा अधिक जागरूक झाला आहे. पक्षांमधील फूट, त्यानंतरचे विलीनीकरण, सत्तेसाठी होणाऱ्या आघाड्या आणि बदलणाऱ्या भूमिका याकडे तो बारकाईने पाहत आहे. त्यामुळे कोणताही राजकीय निर्णय घेताना जनतेच्या विश्वासाचा विचार करणे प्रत्येक पक्षासाठी तितकेच आवश्यक आहे. केवळ सत्तेच्या समीकरणासाठी होणारे निर्णय मतदार सहज स्वीकारेल, असे आता राहिलेले नाही.

राष्ट्रवादी काँग्रेसचे संभाव्य विलीनीकरण घडले, तर महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या समीकरणांची सुरुवात होईल. विरोधी पक्षांची मांडणी, महायुतीचे अंतर्गत संतुलन आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्था तसेच विधानसभा निवडणुकांचे राजकारण यावर त्याचा परिणाम होऊ शकतो. उलट, नेतृत्वाचा पेच कायम राहिला, तर दोन्ही गटांतील दरी आणखी वाढण्याचीही शक्यता नाकारता येणार नाही.

सध्या उपलब्ध घडामोडींकडे पाहता एक गोष्ट स्पष्ट होते राष्ट्रवादीच्या भवितव्याचा निर्णय केवळ दोन गटांच्या एकत्र येण्याचा नाही; तो महाराष्ट्रातील राजकीय स्थैर्य, सत्तेचे समीकरण आणि मतदारांच्या विश्वासाशी जोडलेला आहे. अंतिम निर्णय काहीही असो, तो पारदर्शक राजकीय भूमिकेवर आधारित असावा, हीच लोकशाहीची अपेक्षा आहे. कारण पक्षांचे भविष्य हे केवळ नेत्यांच्या बैठकीत ठरत नाही; त्यावर अंतिम शिक्कामोर्तब मतदारच करतो. हा अग्रलेख विश्लेषणात्मक शैलीत असून, उपलब्ध माहितीच्या आधारे संतुलित भूमिका मांडतो. कोणत्याही अपुष्ट दाव्यांना अंतिम सत्य म्हणून न मांडता राजकीय संदर्भ आणि संभाव्य परिणामांचे विवेचन करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षेतेसाठी महावितरणचे महत्त्वाचे पाऊल

## शाळेसमोरील डीपीला संरक्षक कंपाऊंड वॉल



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** :विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत महावितरणने नेवासा बुद्रुक येथे शाळेसमोरील वीज वितरण केंद्र (डीपी) भोवती संरक्षक कंपाऊंड वॉल उभारण्याचे काम पूर्ण केले आहे.डीपी ही शाळेजवळच असल्यामुळे विद्यार्थी पालक आणि नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने संभाव्य धोका लक्षात घेऊन महावितरणने तातडीने ही उपाययोजना केली

कंपाऊंड वॉलमुळे डीपी परिसरात अनधिकृत प्रवेश रोखला जाणार असून अपघाताचा धोका कमी होण्यास मदत होईल,महावितरणकडून करण्यात आलेली ही सुरक्षा उपाययोजना विद्यार्थ्यांच्या हितासाठी अत्यंत महत्त्वाची असून नागरिकांनीही वीज उपकरणांपासून सुरक्षित अंतर राखावे आणि कोणतीही धोकादायक बाब आढळल्यास त्वरित महावितरणला माहिती द्यावी असे आवाहन महावितरणच्या वतीने करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे शाळेतील विद्यार्थी, शिक्षक,पालक तसेच स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त करत महावितरणचे सहाय्यक अभियंता काकासाहेब बोराडे व इतर वरिष्ठ अधिकारी यांचे या सुरक्षाविषयक निर्णयाचे स्वागत करून त्यांना धन्यवाद दिले आहे.

# वारकऱ्यांचे आशीर्वाद हीच आमची खरी संपत्ती : डॉ. सुजय विखे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी,** आषाढी वारीच्या निमित्ताने वारकरी सेवेला प्राधान्य देत विखे पाटील परिवाराने सेवाभावाची परंपरा कायम राखली असून, वारकऱ्यांचे प्रेम आणि आशीर्वाद हीच आमची खरी संपत्ती असल्याचे प्रतिपादन भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले. आषाढी एकादशीच्या निमित्ताने श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील स्मृती मंडळाच्या भक्तनिवासात मुक्कामी असलेल्या वारकरी दिंड्यांना भेट देऊन संवाद साधला. यावेळी वारकऱ्यांच्या अडचणी जाणून घेत त्यांना शुभेच्छा दिल्या. जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जनसेवा फाउंडेशनच्या वतीने १५ हजारांहून अधिक रेनकोट व शबनम बॅगचे वाटप करण्यात आले. तसेच हजारो वारकऱ्यांसाठी निवास, भोजन, स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, वैद्यकीय सेवा आदी सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे. सुमारे सात हजार चौरस फूट क्षेत्रातील भव्य मंडपात सध्या ४० हून अधिक दिंड्या मुक्कामी असून स्वयंसेवक चोवीस तास सेवेत कार्यरत आहेत. गेल्या ४० वर्षांपासून ही सेवा अखंडपणे सुरू असल्याचे सांगत, वारकऱ्यांच्या सेवेत कोणतीही उणीव राहू नये हीच आमची भूमिका असल्याचे डॉ. सुजय विखे पाटील यांनी नमूद केले. तसेच श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या कृपेने राज्यात सुख, समृद्धी आणि समाधान नांदो, अशी प्रार्थनाही त्यांनी केली.



# राहुरी तालुक्यातील कारवाडी विद्यालयात दिंडी सोहळ्याचे आयोजन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : कारवाडी विद्यालयात आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी दिंडी सोहळ्याचे आयोजन केले ,या दिंडी सोहळ्यात टाळ, पखवाज, लेझीम ,विणा तसेच वारकरी वेशभूषा परिधान करून विद्यार्थ्यांनी विठ्ठल नामाचा गजर केला. विद्यार्थ्यांनी दिंडीतून पाणी ''आडवा ,पाणी जिरवा'' झाडे लावा, झाडे जगवा ,स्वच्छता अभियान ,बेटी बचाओ बेटी पढाओ, प्लास्टिक निर्मूलन असे फलक तयार करून एक चांगला संदेश समाजाला दिला

इयत्ता पाचवी ते बारावीच्या सर्व विद्यार्थ्यांना साबुदाणा खिचडीचे वाटप व राजगिरा लाडू चे वाटप पालक पंढरीनाथ सुळभरे यांनी केले त्यांचा विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

दिंडी सोहळ्यासाठी सर्व शिक्षक ,शिक्षकेतर ,विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

# वृक्षारोपण व स्वच्छता अभियानातून स्व. अजितदादा पवारांना अभिवादन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव,** : राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते स्व. अजितदादा पवार यांच्या जयंती सप्ताहानिमित्त कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्यात वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन व स्वच्छता अभियान राबवून त्यांना मानवंदना देण्यात आली. माजी आमदार अशोक काळे व कारखान्याचे अध्यक्ष आ. आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमात स्व. पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यकारी संचालक सोमनाथ बोरनारे यांनी सेवा, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धन हेच स्व. पवार यांच्या कार्याला खरी आदरांजली असल्याचे सांगितले. जनरल मॅनेजर सुनील कोल्हे यांनी समाजोपयोगी उपक्रमांची परंपरा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमास कारखान्याचे पदाधिकारी, संचालक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# बेलापुरात अनुसूचित जाती उपाययोजना अंतर्गत कृषी निविष्ठा वाटप संपन्न



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : मातीचे आरोग्य सुधारण्यासाठी माती परीक्षण करून योग्य खत नियोजन करण्याचे आवाहन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कृषी तज्ज्ञ डॉ.भीमराव कांबळे यांनी बेलापूर येथे केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, भा.कृ.प. भोपाळ आणि बेलापूर ग्रामपंचायतीच्या विद्यमाने आयोजित अनुसूचित जाती उपायोजना कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते लाभार्थी शेतकऱ्यांना 'फुले मायक्रोग्रेड-२' (द्रवरूप सूक्ष्म अन्नद्रव्य), 'फुले बायोमिक्स' (जीवाणू संवर्धन) आणि कृषी दर्शनीसह कृषी निविष्ठांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमात शेतकरी मार्गदर्शन, माती परीक्षण पद्धती आणि सेंद्रिय कर्ब वाढविण्याबाबत तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास शरद नवले, अभिषेक खंडागळे, सरपंच मीनाताई साळवी यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आषाढी एकादशीनिमित्त तापडिया नाट्य मंदिरात विधाते बंधूंची अभंगवाणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : आषाढी एकादशीच्या निमित्ताने छत्रपती संभाजीनगर येथील तापडिया नाट्य मंदिरात सुप्रसिद्ध गायक राम विधाते व बजरंग विधाते (विधाते बंधू) यांच्या सुश्राव्य अभंगवाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, २५ जुलै रोजी रात्री ८.३० वाजता होणारा हा भक्ती संगीताचा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला आहे. गेली २८ वर्षे अविरतपणे सुरू असलेल्या या भक्ती सोहळ्याचे यंदा २९ वे वर्ष आहे. कार्यक्रमात महाराष्ट्रातील नामवंत वादकांची साथ लाभणार असून रंगमंच व्यवस्थापन जाधव बंधू करणार आहेत. विठ्ठलभक्त व संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# चांद्यातील बाल दिंडीचे ठिक ठिकाणी स्वागत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**चांदा** : नेवासा तालुक्यातील चांदा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील बाल दिंडीचे ठिक ठिकाणी अनेकांनी स्वागत केले. आषाढी एकादशीचे औचित्य साधून येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची शाळेच्या वतीने बाल दिंडीचे आयोजन करण्यात आले होते या दिंडीत भगवे ध्वज घेऊन तसेच विठ्ठल रुक्मिणी पोशाख परिधान करूअन तसेच कपाळी अष्टीगंध डोक्यावर पांढरी टोपी अंगात नेहरू कुर्ता धोती परिधान केलेले तसेच लहाण मुलींनी साड्या डोक्यावर तुळस घेऊन विठू नामाचा गजर करत होत्या या बाल वारकऱ्यांचे अनेक ग्रामस्थांनी कौतुक केले



या दिंडी च्या निमित्ताने चल ग सखे पंढरीला, विठ्ठल नामाची शाळा भरली, अशा अनेक भक्तिगितांच्या तालावर या बाल वारकरणी थिरकत होत्या त्यामुळे या बाल दिंडीचे ग्रामस्थांनी चांगलेच कौतुक केले.या बाल दिंडीस प्रा.शाळेपासून प्रारंभ झाला ती वेशीतून व्यापारी पेठ, होळी मैदान, सोमेश्वर मंदिर, लक्ष्मी चौक, सेंट्रल बँक मार्गे शाळेमध्ये या दिंडीचा समारोप झाला ही दिंडी यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षक व्ही.व्ही. बनकर, एस.के.जाधव, शिक्षिका एम.एम.गर्जे, शांता मरकड / दहातोंडे, एस.डी.पुरी,एस.बी.दुसंग यांनी विशेष परिश्रम घेतले या प्रसंगी शालेय व्यवस्थापन समिती चे आजी माजी अध्यक्ष पदाधिकारी उपस्थित होते.

# २०० कोटींचा टप्पा म्हणजे विश्वासाचा विजय : शिवाजीराव कपाळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : साई आदर्श मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीने २०० कोटी रुपयांच्या ठेवींचा टप्पा गाठणे हा केवळ आर्थिक आकडा नसून, सभासद, ठेवीदार आणि हितचिंतकांनी संस्थेवर दाखविलेल्या अढळ विश्वासाचा विजय असल्याची भावना संस्थापक शिवाजीराव कपाळे (आप्पा) यांनी व्यक्त केली.



ते म्हणाले, ''या यशामागे श्री साईबाबांचे आशीर्वाद, सभासदांचा विश्वास, ठेवीदारांचे प्रेम, हितचिंतकांचे सहकार्य तसेच संचालक, अधिकारी, कर्मचारी आणि पिग्मी एजंट यांचे समर्पित योगदान आहे. संस्थेच्या वाढत्या ठेवी, शाखा आणि खातेदारांसोबत अधिक पारदर्शक, सुरक्षित व विश्वासार्ह आर्थिक सेवा देण्याची आमची जबाबदारीही वाढली आहे.''

**प्रवासाचा शेवट नसून नव्या ध्येयांकडे वाटचाल**

''२०० कोटींचा हा टप्पा हा प्रवासाचा शेवट नसून नव्या ध्येयांकडे वाटचाल करण्याची प्रेरणा आहे. यापुढेही सेवाभाव, प्रामाणिकपणा आणि पारदर्शक कारभाराच्या बळावर ठेवीदारांचा विश्वास कायम राखत संस्था समाजहितासाठी कार्यरत राहील,'' असा विश्वासही कपाळे यांनी व्यक्त केला.

# श्रीरामपूर महिला मंडळातर्फे विद्यार्थिनींचा गुणगौरव



छायाचित्र - अमोल कदम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : येथील महिला मंडळाच्या वतीने आयोजित गुणगौरव सोहळ्यात शहरातील व नजीकच्या २२ शाळांतील दहावीच्या परीक्षेत प्रथम आलेल्या विद्यार्थिनींचा रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. गेल्या ३३ वर्षांपासून हा उपक्रम राबवला जात आहे. मॉडेल इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका सोनिया गुलाटी प्रमुख पाहुण्या म्हणून, तर मंडळाच्या विश्वस्त वैशाली गिरमे अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी मंडळाच्या सदस्यांच्या पाल्यांच्या विशेष नैपुण्याचा व महिलांच्या विविध क्षेत्रातील योगदानाचाही गौरव करण्यात आला. सौ.गुलाटी यांनी मंडळाच्या उपक्रमाचे कौतुक केले. प्राजक्ता कुलकर्णी व प्रीती आगाशे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्षा रमा पोफळे, सचिव स्मिता जोशी, खजिनदार सौ. रचना संभूस व कार्यकारिणीने परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जच्या निषेधार्थ राहुरी कडकडीत बंद



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : दिल्लीतील जंतर-मंतर येथे २० जुलै रोजी विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिस लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी दिलेल्या महाराष्ट्र बंदच्या हाकेला राहुरी तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शुक्रवारी (दि. २४) राहुरी शहरातील व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने शंभर टक्के बंद पाळत आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब जाधव व जिल्हा संपर्कप्रमुख पिंटू नाना साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलनाचे आयोजन करण्यात आले.सकाळी राजवाडा परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आंदोलनाची सुरुवात झाली. त्यानंतर लक्ष्मीनगर येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. यानंतर कार्यकर्त्यांनी मोटारसायकल रॅलीद्वारे शहरातून फेरी काढत शनी चौकातील संविधान स्तंभाला अभिवादन केले. तेथे झालेल्या सभेत विविध वक्त्यांनी दिल्लीतील घटनेचा तीव्र निषेध नोंदविला.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जची जबाबदारी स्वीकारून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. संविधानाचे वाचन करून आंदोलनाची सांगता करण्यात आली. आंदोलनात जिल्हा प्रवक्ते अनिल जाधव, शहराध्यक्ष ऋषिकेश साळवे, तालुका उपाध्यक्ष गणेश पवार, तालुका संपर्कप्रमुख नागेश जाधव यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे तालुकाध्यक्ष विलास साळवे, शिरीष गायकवाड, आदिवासी संघर्ष सेनेचे नामदेव पवार, विरोधी गटनेते अरुण साळवे, बाबा साठे, सचिन साळवे, नंदू शिंदे, निलेश जगधने, अनुसंगम शिंदे, दादू साळवे आदींनीही आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. दुपारपर्यंत शहरातील बहुतांश व्यापारी प्रतिष्ठाने बंद राहिल्याने राहुरीत कडकडीत बंदचे चित्र पाहायला मिळाले. आंदोलनादरम्यान शांततेचे वातावरण कायम राखण्यात आले असून विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# कचरा वेचण्याच्या बहाण्याने 'रेकी'

## अन् बंद घर गाठून चोरी; आळेफाट्यात महिलांच्या अट्टल टोळीचा कारनामा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा** : हातात प्लास्टिकच्या मोकळ्या बाटल्या आणि कचरा गोळा करण्याचे पोते... वरून अत्यंत लाचार दिसणाऱ्या या महिलांच्या डोक्यात मात्र भलताच प्लॅन शिजत होता! रस्त्याच्या कडेला कचरा वेचण्याच्या बहाण्याने फिरत बंद घरांची 'रेकी' करायची आणि संधी मिळताच कडी-कोयंडा तोडून डल्ला मारायचा, असा फंडा वापरणाऱ्या सराईत टोळीचा पर्दाफाश झाला आहे.

आळेखिंड परिसरातील समाधान हॉटेल पाठीमागील भागात दुपारी १२ ते १ च्या सुमारास हा थरार घडला. सुदैवाने, नागरिकांच्या सतर्कतेमुळे चोरीचा हा डाव उधळला गेला असून दोन महिलांना मुद्देमालासह जागेवरच पकडण्यात यश आले आहे.

संतवाडी शिवारात राहणाऱ्या भामाबाई सोनभाऊ निमसे यांचे घर बंद असल्याचे पाहून ४ जणांच्या टोळीने (३ महिला व १ पुरुष) दरवाजा तोडून आत प्रवेश केला. घरातील जुने तांब्या-पितळाची भांडी व बंब पोत्यात भरले. दरम्यान, बंद घरातून आवाज आल्याने भामाबाईंना संशय आला. त्यांनी खिडकीतून डोकावून पाहिले असता, कचरा वेचणाऱ्या महिला सामान भरताना दिसल्या.

'बिसलरी' गोळा करणाऱ्यांच्या हातात 'पहाणे'!....

ही टोळी जुन्नर तालुक्यातील सराईत गुन्हेगार असण्याची शक्यता आहे. हातात रिकाम्या बाटल्या धरून फिरायचे, जेणेकरून संशय येणार नाही. घर बंद असल्याची खात्री पटल्यावर लोखंडी हत्याराने (पहाणे) दरवाजा तोडायचा...

नागरिकांचा पाठलाग अन् दीड लाखाचा ऐवज जप्त

भामाबाईंनी आरडाओरड करताच नागरिक धावून आले. नागरिकांनी पाठलाग करत दोन महिलांना गनिमी काव्याने घेरून पकडले, तर १ महिला व १ पुरुष पसार झाले. आळेफाटा पोलिसांनी दोन महिलांना ताब्यात घेऊन दीड लक्ष किमतीची भांडी व साहित्य जप्त केले आहे. फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द•ख•ल

### वयोवृद्धाला स्थानिकांकडून मदतीचा हात

**श्रीरामपूर :** तालुक्यातील बेलापूरच्या आझाद मैदानाजवळ तीन दिवसांपासून आजारी अवस्थेत पडून असलेल्या 'गांगुर्डे' नावाच्या वयोवृद्ध व्यक्तीला स्थानिकांच्या मदतीने बेलापूर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या पथकाने तातडीने प्राथमिक उपचार दिले. त्यानंतर त्यांना पुढील उपचारासाठी अहिल्यानगरच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून, नातेवाईकांनी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### म्हस्के पाटील शैक्षणिक संकुलात उत्साहात साजरी झाली पंढरीची वारी

**बाभळेश्वर :** आषाढी एकादशीच्या निमित्ताने राहाता तालुक्यातील बाभळेश्वर येथील म्हस्के पाटील शैक्षणिक संस्थेत विद्या विकास पब्लिक स्कुल व ज्युनिअर कॉलेज या विद्यालयात पंढरीची वारी उत्साहात साजरी करण्यात आली. बालवाडी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी वारकरी, विठ्ठल-रुक्मिणी व विविध संतांच्या वेशभूषेत या दिंडीत सहभाग घेतला. टाळ-मृदुंगाचा गजर आणि शिक्षणाची वारी या घोषणांनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. मुख्याध्यापक राजेंद्र नालकर यांनी संस्कृती व संस्कार रुजवण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व स्पष्ट केले. दिंडीनंतर विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहीम राबवून सामाजिक संदेश दिला व विद्यार्थ्यांना महाप्रसाद वाटप करण्यात आला. संस्थापक रावसाहेब म्हस्के पाटील व मान्यवरांच्या उपस्थितीत हा उपक्रम पार पडला.

### आषाढी एकादशीनिमित्त श्रीरामवाडी शाळेत पायी दिंडी सोहळा



**सोनई :** नेवासा तालुक्यातील सोनई येथील श्रीरामवाडी या शाळेत पायी दिंडी सोहळ्याचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषात, टाळ-मृदंगाच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात विद्यार्थ्यांनी गावातून दिंडी काढत वारकरी परंपरेचा सुंदर वारसा जपला. दिंडीमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी अभंग, भजने, गवळणी आणि पोवाडे सादर करून उपस्थितांना भक्तिरसात न्हाऊ घातले. पारंपरिक वेशभूषेतील विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे दिंडीला विशेष आकर्षण लाभले. दिंडीनंतर विद्यार्थ्यांनी 'माऊली' गीतावर सादर केलेल्या मनमोहक नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या सादरीकरणाला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त टाळ्यांच्या गजरात दाद देत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

### चिमुकल्यांच्या वारीने वाकडीत अवतरली पंढरी



**वाकडी :** आषाढी एकादशीच्या निमित्ताने राहाता तालुक्यातील खंडोबाची वाकडी येथील श्री लक्ष्मी नारायण विद्यालय व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या सुमारे एक हजार विद्यार्थ्यांनी वारकरी वेश परिधान करून गावातून भव्य पायी दिंडी काढली. विठ्ठल-रुक्मिणी व संतांच्या वेशातील चिमुकल्यांनी टाळ, मृदुंग, पखवाजाच्या गजरात हरिनामाचा जयघोष केला. गावातील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात पालखीचे स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांनी लेझीम, पावली आणि अभंग सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या भक्तिमय दिंडीमुळे संपूर्ण वाकडी परिसर पंढरीमय झाला.

# वारी पंढरीची... ज्ञानगंगा प्रवरेची!

## प्रवरेच्या ४० हजार विद्यार्थ्यांच्या दिंडीने गावोगावी विठ्ठल भक्तीचा जागर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** भक्ती, संस्कृती आणि संस्कारांची अखंड परंपरा जपत लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित वारी पंढरीची... ज्ञानगंगा प्रवरेची हा अभिनव उपक्रम यंदा संस्थेच्या सर्व शैक्षणिक संकुलांमध्ये मोठ्या भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. गावोगावी निघालेल्या पायी दिंड्यांमधून विठ्ठल नामाचा अखंड जयघोष, टाळ-मृदुंगाचा गजर आणि अभंगवाणीने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

कपाळी केशरी गंध, देवा मला तुझा छंद, विठ्ठल... विठ्ठल... जय हरी विठ्ठल, रुक्मिणी-विठ्ठल अशा गजरात विद्यार्थ्यांनी वारीचा आनंद लुटला. विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्यासह



विविध संत-महंतांच्या वेशभूषेत सजलेल्या चिमुकल्यांनी वारीची परंपरा जिवंत केली. टाळ, मृदुंग, फुगड्या, पावली, भारूड, अभंग आणि भक्तिपर नाटिकांमधून वारकरी संप्रदायाचा संदेश प्रभावीपणे सादर करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष तथा राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अण्णासाहेब म्हस्के पाटील, माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील, भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील तसेच संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या विविध शाळा व महाविद्यालयांतील सुमारे ४० हजार विद्यार्थ्यांनी आपल्या-आपल्या गावांमध्ये पायी दिंडी सोहळा आयोजित केला. या उपक्रमात विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

अधूनमधून बरसणारा रिमझिम पाऊस, वातावरणातील आल्हाददायक गारवा आणि त्यात दुमदुमणारा विठ्ठल नामाचा गजर यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. अनेकांना प्रत्यक्ष पंढरपूरच्या वारीला जाता येत नसले तरी या उपक्रमामुळे गावातच वारीचा अनोखा आणि अविस्मरणीय अनुभव घेण्याची संधी मिळाली.

लोणी येथे प्रवरा कन्या विद्यामंदिर, अहिल्याबाई होळकर विद्यालय आणि प्रवरा गर्ल्स इंग्लिश मीडियम स्कूलच्या सुमारे पाच हजार विद्यार्थ्यांनी भव्य पायी दिंडी काढून ग्रामस्थांचे लक्ष वेधले. पालखी पूजन माजी मंजी अण्णासाहेब म्हस्के पाटील, डॉ.सुस्मिता विखे, शिक्षण संचालिका लीलावती सरोदे,प्राचार्या विद्या घोरपडे,रेणू पाटील आणि ग्रामस्थांच्या हस्ते करण्यात आले.

दिंडीनंतर राम मंदिर प्रांगणात विद्यार्थ्यांनी पावली, भारूड, अभंग, विठ्ठल भक्तीचा महिमा सांगणाऱ्या नाटिका तसेच संतपरंपरेवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. विद्यार्थ्यांची आकर्षक वेशभूषा आणि भक्तिभावाने सादर केलेले कार्यक्रम उपस्थितांची मने जिंकून गेले.

> प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच संस्कारक्षम शिक्षण देण्यावर भर दिला जातो. सण-उत्सव आणि परंपरांच्या माध्यमातून भारतीय संस्कृती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न असतो. दोन वर्षांपासून 'वारी पंढरीची, ज्ञानगंगा प्रवरेची' हा उपक्रम राबविला जात आहे. यंदा सर्व शाळांनी आपल्या गावात दिंडी काढून वारीची परंपरा गावागावात पोहोचविली. विद्यार्थ्यांसह शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग या उपक्रमाचे मोठे यश ठरले.
>
> **डॉ. सुस्मिता विखे,**
> **मुख्य कार्यकारी अधिकारी,**
> **प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था**

## राजुरीत विठ्ठलभक्तीचा आणि वारकरी संस्कृतीचा अभूतपूर्व जागर




**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**राजुरी :** आषाढी एकादशीचे औचित्य साधत राहाता तालुक्यातील श्री.यशवंतराव चव्हाण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, राजुरी येथे 'वारी पंढरीची, ज्ञानगंगा प्रवरेची' या अत्यंत प्रेरणादायी उपक्रमांतर्गत एका भव्य आणि उत्साहपूर्ण दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यामुळे संपूर्ण राजुरी गाव भक्तिरसात न्हाऊन निघून विठ्ठलभक्तीमय झाले होते. गावातून अत्यंत पारंपरिक पद्धतीने काढण्यात आलेल्या या दिंडीत संपूर्ण परिसर ज्ञानोबा-तुकाराम आणि विठ्ठल-विठ्ठल च्या जयघोषाने दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांनी वारकरी संतांच्या सजीव वेशभूषेत सहभाग घेत उपस्थितांचे लक्ष वेधले. टाळ-मृदुंगाचा निनाद, पारंपरिक अभंग गायन, भारूड सादरीकरण आणि हरिनामाच्या गजराने उपक्रमात चैतन्य निर्माण केले.

विद्यार्थ्यांमध्ये वारकरी परंपरा, संतांचे महान विचार आणि समृद्ध भारतीय संस्कृतीची ओळख व्हावी, तसेच त्यांच्यात उत्तम संस्कार व अध्यात्मिक जाणीव रुजावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या दिंडी सोहळ्यास राजुरी गावातील ग्रामस्थ, पालक, तसेच शालेय प्रशासनाचा उत्स्फूर्त आणि मोठा प्रतिसाद लाभला. या सोहळ्यात शाळेचे प्राचार्य डॉ. घोडे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका दिवे, उच्च माध्यमिक विभाग प्रमुख रोकडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख कोकणे यांच्यासह सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता. तसेच गावातील प्रतिष्ठित मान्यवर मारुती गोरे, डॉ. सोमनाथ गोरे, आप्पासाहेब लाळगे,सुधीर गोरे, संतोष गोरे आणि हौशीराम जाधव हे विशेष रूपने सहभागी झाले होते.

## गटकळ शाळेत रंगला आषाढी एकादशी निमित्त रिंगण सोहळा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** गटकळ शाळेमध्ये शाळेचे संस्थापक अध्यक्ष ड भाऊसाहेब टेमक व सुरेखा टेमक यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी एकादशीनिमित्त दिंडीचे आयोजन करण्यात आले होते विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांच्या वेशभूषा करून दिंडीमध्ये सहभाग घेतला



आषाढी दिंडीमध्ये रिंगण सोहळा , पावली खेळ , झेंडा मिरवणूक विठ्ठलाच्या गाण्यावर नृत्य विद्यार्थ्यांनी सादर केले . हा रिंगण सोहळा पाहण्यासाठी पालक,आजी आजोबा मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेच्या प्रांगणामध्ये भरलेला रिंगण सोहळा पाहून पालक भारावून गेले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेच्या प्राचार्य भारती कुदळे सुपरवायझर वर्षे मगर माधुरी गटकळ सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योती कोलते व महेश शिंदे यांनी केले व आभार प्रदर्शन पवन घोगरे यांनी केले. कार्यक्रम झाल्यानंतर विद्यार्थ्यांना खाऊ देण्यात आला.

## महात्मा फुलेंचा समता आणि बंधुत्वाचा वारसा जपा : डॉ. विलास खर्चे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** महात्मा फुले यांचा समता, बंधुता आणि सत्यशोधनाचा वारसा जपा. शेतकरी आणि सर्वसामान्य माणसाला कृषि तंत्रज्ञान अवगत करून द्यावे तसेच शेतकरी समृद्धीसाठी सतत कार्यरत रहा असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले. महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त आयोजित समता दौडमध्ये सहभागी विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी यांना संबोधित करताना कुलगुरू बोलत होते. महात्मा फुले कृषि विद्यापीठातील डॉ. अण्णासाहेब शिंदे शासकीय कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात महात्मा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त समता दौड आयोजित करण्यात आली होती. सुरूवातीला महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे यांनी सहभागी विद्यार्थी व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना प्रबोधन केले व दौड सुरू झाली.

## डॉक्टरांच्या समस्या व सुरक्षेचा घेतला आढावा

### श्रीरामपूरात पोलिसांची बैठक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** शहरातील वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रीरामपुरात महत्त्वाची बैठक पार पडली. डॉक्टरांना कोणी त्रास देत आहे का, खंडणी मागितली जात आहे का, या महत्वपूर्ण अन्य विषयांवर चर्चा करण्यासाठी ही बैठक बोलावण्यात आली होती.

बैठकीत पोलिसांनी डॉक्टरांच्या समस्या ऐकून घेत, कोणाचीही तक्रार किंवा भीती असल्यास न संकोचता पोलिसांना सांगावे, असे आवाहन केले. पोलीस निश्चितच न्याय देतील, असे आश्वासन यावेळी देण्यात आले. तसेच रुग्णांच्या नातेवाईकांकडून त्रास झाल्यास तातडीने ११२ क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले. या बैठकीस पो.नि. विशाल खैरे यांच्यासह शहरातील डॉ. रविंद्र जगधने, डॉ. दिलीप शिरसाट, डॉ. शेळके, डॉ. राहिंज, डॉ. देशपांडे, डॉ. सोमाणी, डॉ. बधे, डॉ. शुक्ला, डॉ. कारवा व डॉ. चव्हाण यांच्यासह प्रमुख डॉक्टर उपस्थित होते.

## बाल वारकऱ्यांनी दिंडीतून दिला सामाजिक संदेश



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

### जेटीएस व एस.आर.के.ची दिंडी ठरली आकर्षणाचा केंद्रबिंदू

**श्रीरामपुर :** वारकरी संप्रदायाच्या रंगात रंगलेले, कपाळाला बुक्का लावलेले आणि हातात टाळ-चिपळ्या घेतलेले लहानग्यांचे गोजिरवाणे रूप.बेलापुर एज्युकेशन सोसायटीच्या जेटीएस हायस्कूल व शेठ राम धनजी खटोड स्कूलच्या वतीने आषाढी एकादशीच्या निमित्ताने आयोजित केलेली दिंडी आणि पालखी सोहळा बेलापुरकरांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली आहे.

केदारनाथ मंत्री यांच्या हस्ते सपत्नीक पूजा करण्यात आली.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष अशोक साळुंके,विश्वस्त ड.विजय साळुंके,रविंद्र खटोड, भरत साळुंके,शेखर डावरे,प्राचार्य दत्तात्रय पुजारी,उपमुख्याध्यापक भानुदास खरात,पर्यवेक्षक पोपट गावडे,दिंडी उत्सव प्रमुख प्रदीप नवले आदी उपस्थित होते.ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच मीना साळवी,उपसरपंच चंद्रकांत नवले, शरद नवले, अभिषेक खंडागळे, देविदास देसाई, दिलीप दायमा आदींनी तर बेलापुर पोलिस ठाण्याच्या वतीने बाळासाहेब कोळपे,भारत तमनर,संपत बढे,नंदकिशोर लोखंडे,जालिंदर माने,आकाश वाघमारे आदींसह अनेक मान्यवरांनी स्वागत केले.

पांढरेशुभ्र धोतर-कुर्ता, डोक्यावर गांधी टोपी, कपाळाला चंदन-बुक्क्याचा टिळा लावलेले बाल वारकरी हातात टाळ घेऊन नाचत होते.

त्यांच्या पावलांमधील लय आणि चेहऱ्यावरील निष्पाप आनंद पाहून नागरिक भारावून गेले.

विठ्ठल-रखुमाई, ज्ञानेश्वर माऊली, जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या रूपातील वेशभूषा, डोक्यावर तुळशीवृंदावन घेतलेल्या आणि नऊवारी साडी नेसलेल्या मुली आकर्षणाचा केंद्र बिंदू ठरला. 'ज्ञानबा-तुकाराम' आणि 'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल' या गजराने बेलापुर दुमदुमून गेले होते.

या दिंडीतून पर्यावरणाचे रक्षण, बेटी बचाव-बेटी पढाव, आणि स्वच्छतेचा,शिक्षणाचे महत्व आदी संदेश देण्यात आला.

दिंडी मार्गावर ठिकठिकाणी महिलांनी दिंडीचे औक्षण व पूजन केले. बाल वारकऱ्यांना खाऊ आणि पाण्याचे वाटप करण्यात आले. लहानग्यांच्या या शिस्तबद्ध आणि भक्तीमय सादरीकरणामुळे दिंडीने खऱ्या अर्थाने सर्वांची मने जिंकली अशी प्रतिक्रिया नागरिकांनी दिली.

यावेळी बेलापुर पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## त्रिमूर्तीच्या कलाशिक्षकाने खोबऱ्याच्या गोट्यावर साकारली विठ्ठल मूर्ती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासाफाटा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलातील कलाशिक्षक नागोराव लाहोरकर यांनी आषाढी एकादशीच्या पर्व काळाचे औचित्य साधून खोबऱ्याच्या गोट्यावर दोन तासांच्या कालावधीत विठ्ठल



मूर्तीब्लेडचा वापर करून आपल्या कला कुसरीतून साकार केली आहे.त्यांच्या या कलेचे कौतुक होत आहे. नागोराव लाहोरकर हे त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलामध्ये कलाशिक्षक म्हणून सेवेत आहे आषाढी एकादशी येत असल्याने नारळाच्या खोबरे गोट्यावर त्यांनी ब्लेडद्वारे विठ्ठलाची मूर्ती कोरून साकार केली आहे. त्यासाठी त्यांना दोन तासाचा कालावधी लागला, मूर्ती कोरून तयार झाल्यानंतर लाहोरकर सरांनी रेडियमद्वारे विठुरायाला सुंदर वस्त्र तयार केले.

## कबड्डी क्षेत्रातील योगदानाबद्दल प्रा. काळे यांचा राज्यस्तरीय सन्मान

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** कबड्डी क्षेत्रात तीन दशकांहून अधिक काळ उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल दादासाहेब घाडगे पाटील विद्यालयाचे प्राचार्य सोपानराव काळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनच्या वतीने रत्नागिरी येथे आयोजित कार्यक्रमात उद्योग विकास मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते त्यांना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. त्यानिमित्त ज्ञानोदय इंग्लिश स्कूल व कै. सौ. सुंदरबाई हिरालाल गांधी कन्या विद्यालयात सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य रावसाहेब चौधरी होते. यावेळी आंतरराष्ट्रीय कुस्ती पंच संभाजी निकाळजे, प्राचार्या सुरेखा पारखे, पर्यवेक्षक सुनील धस, जनार्दन बनकर, अनिल भणगे, शरद व्यवहारे आदी उपस्थित होते. लोकमान्य टिळक यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमापूजन करण्यात आले.

प्रश्नमंजुषा स्पर्धेतील विजेत्यांचा गौरवही करण्यात आला.

प्राचार्य काळे यांनी खेळातील सातत्य, शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीचे महत्त्व अधोरेखित केले, तर अध्यक्षीय भाषणात प्राचार्य चौधरी यांनी हा सन्मान ग्रामीण भागातील क्रीडाप्रेमींसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले.


## जाहीर प्रगटन

क्रमांकः कावि/फौजदारी /१९४/२०२६
तहसिल कार्यालय नेवासा
तालुका नेवासा जि. अहिल्यानगर
दिनांकः २४/०७/२०२६

अर्जदार श्रीम. **रुचिता संताराम डमाळे** रा. नेवासा बु ता. नेवासा जि. अहिल्यानगर यांनी त्यांचे आई कै. **अनिता नामदेव गायकवाड विवाह पुर्विचे नाव नंतरचे नाव अनिता संताराम डमाळे** हे दिनांक १४/०६/२०२६ रोजी मयत झालेले आहेत. मयत व्यक्ती **जिल्हा परीषद प्राथमीक शाळा नेवासा फाटा ता.नेवासा जि.अहिल्यानगर** येथे **उपाध्यापिका** म्हणुण शासकीय सेवेत होते. शासकीय सेवेतील त्यांच्या जमा असलेल्या रकमा जसे की, त्याचे पेन्शन विषयी/शासकीय कामासाठी Heirship Certificate मिळण्यासाठी या कार्यालयासा अर्ज सादर केलेला आहे. सदरच्या अर्जात त्यांना खालील प्रमाणे वारस असल्याचे नमुद केलेले आहे.

| अ. क्र | वारसांची नावे | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १. | धनश्री संताराम डमाळे | २८ | मुलगी |
| २. | रुचीता संताराम डमाळे | २० | मुलगी |

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील Heirship Certificate बाबतचे कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहिर प्रगटनाच्या तारखेपासुन ७ दिवसाचे आत सादर करावा. मदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदारास Heirship Certificate निर्गमित करण्यात येईल.

शिक्का

**सही/-**
**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## जाहीर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांक: जन्म-मृत्यु एसआर/ २००/२०२६
नेवासा दिनांक २१/०७/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-राधा विश्वनाथ पवार रा. खरवंडी ता.नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. कु. राधा विश्वनाथ पवार रा. खरवंडी ता.नेवासा यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

**सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.**

| अ. क्र | जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव | गावाचे नाव | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | राधा विश्वनाथ पवार | खरवंडी | ३०/०५/१९९० |

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

शिक्का

**सही/-**
**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## जाहीर नोटीस

तमाम नागरीकांना, सहकारी सोसायटी, सर्व खाजगी व सरकारी बँका, खाजगी सावकार, व्यक्ती व नातेवाईक यांना कळविणेत येते की, मौजे शेडगाव ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर येथील खालील नमुद यांच्या मालकीच्या ताब्यातील व कब्जेवहीवाटीतील शेतजमिन मिळकती आहेत.

| अ. न. | जमिन मालकांचे नाव | सर्वे क्र. व गट क्र. | क्षेत्र हेक्टर आर मध्ये | जमिनीचे एकूण क्षेत्र एकर मध्ये |
|---|---|---|---|---|
| १. | विजयसिंह अरुण राजेभोसले | ३५८ | ४.६६ | ११.६५ |
| २. | मनिषा विजयसिंह राजेभोसले | ३५८ | ४.६६ | ११.६५ |
| ३. | अर्चिस विजयसिंह भोसले | ३५८ | ४.६६ | ११.६५ |
| | एकूण क्षेत्र | | १३.९८ | ३४.९५ |

सदरहू आमचे पक्षकार Ceigall Green Energy MH1 Limited Office A-898, Tagore Nagar, Ludhiana 141001 Punjab यांना भाडेपट्टा कराराने देण्याचे विचारात आहेत. तरी सदर मिळकती संबंधी कोणाचेही हक्क, कर्ज, हितसंबंध दस्त असल्याचे त्यांनी ही नोटीस जाहीर होताच आठ दिवसांत मुळ दस्तऐवजासह आमचे पक्षकारांना भेटून आमचे व पक्षकाराचे समाधान करावे. त्यानंतर कोणीही काहीही हरकत घेतल्यास किंवा कोणाचा काही दस्त किंवा व्यवहार असल्यास तो आमचे पक्षकार जाहीर नोटीस प्रसिद्ध करणार यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आमचे मार्फत प्रसिद्ध केली असे.

दि.- १५/०५/२०२६

शिक्का

**ॲड. योगेश्वर हरिभाऊ पवार**
पत्ता- पाईपलाईन रोड, श्रीराम चौक, कृष्णा कॉम्पलेक्स, पहिला मजला, शॉप नं- १०६ ता. जि. अहमदनगर
पिन ४१४००१. मो. नं. ७९७२९४९६७४.

## पान १ वरुन

### २६ दिवसांनंतर सोनम वांगचुक यांचे उपोषण मागे

असंही अभिजीत दीपके यांनी सांगितले. केंद्रीय मंत्री जेपी नड्डा आणि जितेंद्र सिंह, यांनी रुग्णालयात सोनम वांगचुक यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी सरकारने कोणत्या मागण्या मान्य केल्या आहेत याची माहिती दिली. जेपी नड्डा यांनी सोनम वांगचुक यांना सरकारचे संपूर्ण आश्वासन वाचून दाखवले. यामध्ये केंद्र सरकारने ३ महत्वाच्या अटी मान्य केल्या. २० जुलै रोजी शांततेने आंदोलन करून संसदेवर मोर्चा काढणाऱ्या विद्यार्थ्यांवर कोणताही गुन्हा दाखल केला जाणार नाही. परीक्षेसंदर्भात पेपरफुटी आणि शिक्षण प्रणालीतील सुधारणांवर संसदेत चर्चा करण्यास सरकार तयार आहे. नीट पेपरफुटीमुळे आत्महत्या केलेल्या मुलांच्या कुटुंबीयांना नुकसान भरपाई देण्याचाही विचार केला जाईल.

### पेपरफुटीतील दोषींना १० वर्षांचा तुरुंगावास, १० कोटींचा दंड

या विधेयकाच्या मसुद्यावर शुक्रवारी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा झाली आणि प्रस्तावित कायद्याला अंतिम स्वरूप दिले. संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा दुसरा आठवडा सुरू झाल्यावर, प्रश्नपत्रिका फुटण्याच्या प्रकरणांमध्ये कठोर कारवाईची तरतूद असलेले विधेयक आणले जाईल आणि ते लवकरात लवकर मंजूर करून घेण्याचा आम्ही प्रयत्न करू, असे मोदी यांनी म्हटले आहे.

### १५ ऑगस्टपासून १० किलोचा सिलिंडर मिळणार

निव्वळ तोटा झाला असला, तरी हा तोटा बाजारतज्ज्ञांच्या अंदाजापेक्षा खूपच कमी आहे. यामुळेच अनेक आघाडीच्या ब्रोकरेज फर्म्सनी कंपनीच्या शेअर्सवर आपला सकारात्मक विश्वास कायम ठेवला आहे. दरम्यान, जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये होणाऱ्या चढ-उतारांचा परिणाम आगामी काळातील कमाईवर होऊ शकतो, असे कंपनीने स्पष्ट केले आहे. त्यातच आता कंपनीने १० किलो वजनाचा सिलिंडर वितरित करण्याची घोषणा केली आहे.

### पांडुरंग पावला... भंडारदरा ओव्हरफ्लो!

धरणात मोठ्या प्रमाणात होत असलेली पाण्याची आवक लक्षात घेऊन जलसाठा ९० टक्क्यांच्या जवळ पोहचताच धरणातील पाणीसाठा नियंत्रणासाठी स्पीलवेमधून पाणी सोडण्यास सुरवात करण्यात आली. काल सायंकाळी १८४६ क्युसेक असणारा विसर्ग आज सकाळी १० हजार ८४६ क्युसेक नंतर दुपारी २० हजार ११० क्युसेक झाला होता. धरण परिचलन सूचीप्रमाणे या महिन्यात धरण पूर्ण भरू न देता धरणातील पाणी साठा ९० टक्क्याच्या आसपास स्थिर ठेवला जातो. त्यामुळे काठोकाठ तुडुंब भरलेले धरण पहाण्यासाठी काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे.

### मंत्री राधाकृष्ण विखेंच्या बदनामी प्रकरणी एकावर गुन्हा

विखे पाटील यांचे समर्थक, विरोधी गट तसेच दोन समाजामध्ये द्वेष आणि शत्रुत्व निर्माण करण्याच्या उद्देशाने हा बनावट व्हिडिओ व्हायरल करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. सदर पोस्टमधील सर्व आरोप पूर्णपणे निराधार, तथ्यहीन असून त्यांचा वास्तवाशी कोणताही संबंध नाही.मंत्री विखे पाटील यांची प्रतिमा मलिन करण्याच्या आणि द्वेष पसरवण्याच्या उद्देशाने कृत्य केल्याप्रकरणी लोणी पोलिसांनी आरोपी गणेश डेंगळे याच्या विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ (बी एन एस) क्र. ३६६/२०२६ नुसार ३३६(२), ३३६(३), ३३६(४), ३५३, ३५३(२), ३५६, ३५१ आणि ३५२ या प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहेत.

## माऊलीच्या नामघोषात दुमदुमले पिंपरखेडा

### स्वच्छता प्रभात फेरीतून सामाजिक संदेश




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर :** आषाढी एकादशीच्या निमित्ताने इकोसत्व संस्था, नूतन माध्यमिक विद्यालय आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिंपरखेडा यांच्या संयुक्त विद्यमाने माऊली दिंडी व स्वच्छता प्रभात फेरीचे उत्साहात आयोजन करण्यात आले. धार्मिक परंपरेबरोबरच स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

वारकरी वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी टाळ-मृदंगाच्या गजरात ''ज्ञानोबा-तुकाराम'' आणि ''पुंडलिक वरदे हरी विठ्ठल'' अशा जयघोषांसह दिंडी काढली. ''स्वच्छता हीच सेवा'', ''स्वच्छ गाव-सुंदर गाव'', ''ओला व सुका कचरा वेगळा करा'', ''स्वच्छ भारत-निरोगी भारत'' असे संदेश देणारे फलक हातात घेऊन विद्यार्थ्यांनी नागरिकांमध्ये जनजागृती केली. स्वच्छ परिसर, योग्य कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन करण्यात आले.

हनुमान मंदिर परिसरात दिंडी पोहोचल्यानंतर विद्यार्थ्यांनी पारंपरिक फुगडी सादर करून संस्कृती, एकात्मता आणि स्वच्छतेचा संदेश दिला. कार्यक्रमाची सांगता नूतन माध्यमिक विद्यालयात झाली. सहभागी विद्यार्थ्यांना फळांचे वाटप करण्यात आले. उपक्रमात इकोसत्व संस्थेचे महादेव चांदगुडे, साहिल शिरसाठ, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर दवंडे, अविनाश भीवसने, आशिष गावंडे, मोहन नेहरकर, मिता जक्कल, पूजा पवार, शिवनारायण जाधव, रामकृष्ण पाटील, शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मोहन नेहरकर व अविनाश भीवसने यांनी विशेष परिश्रम घेतले.

## सुरेगावातील सामाजिक सभागृहाचे बांधकाम सहा वर्षांपासून रखडले; ग्रामस्थांमध्ये संताप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** सुरेगाव (जुने गावठाण) येथील नवबौद्ध घटकासाठी मंजूर करण्यात आलेल्या २५ लाख रुपये खर्चाच्या सामाजिक सभागृहाचे बांधकाम तब्बल सहा वर्षांपासून रखडल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी आणि संबंधित ठेकेदार यांच्या दुर्लक्षामुळे हे काम प्रलंबित असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून, आमदार विवेक कोल्हे यांनी याकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे. सन २०१९-२० या आर्थिक वर्षात माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांच्या स्थानिक विकास निधीतून या सभागृहाला मंजुरी देण्यात आली होती. सुरुवातीला निवडलेल्या जागेबाबत काही नागरिकांनी हरकत घेतल्याने काम थांबले. त्यानंतर ग्रामपंचायतीने सुरेगावच्या जुन्या गावठाणातील पर्यायी जागा निश्चित करून त्याबाबतचे पत्र सार्वजनिक बांधकाम विभागाकडे दिले. या ठिकाणी सर्वधर्मीय धार्मिक कार्यक्रम तसेच आदिवासी समाजाच्या विविध सामाजिक उपक्रमांसाठी सभागृह उपयुक्त ठरणार असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.



मात्र जागेचा प्रश्न निकाली निघूनही बांधकामाला सुरुवात न झाल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे.

**माजी आ. स्नेहलता कोल्हे यांच्या निधीतून मंजूर झालेले हे सामाजिक सभागृह अद्याप अपूर्ण असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. येत्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये हा मुद्दा गाजण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, काम तातडीने सुरू न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.**

शासनाच्या नियमानुसार मंजूर कामे निश्चित कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित असताना हे काम वर्षानुवर्षे रखडल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ग्रामस्थांनी संबंधित काम तातडीने सुरू करण्याची मागणी केली असून, चालू आर्थिक वर्षात कामाला प्रारंभ न झाल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व ठेकेदारांविरोधात जनहित याचिका दाखल करण्याचा इशाराही दिला आहे.

## लोकसभेत कांदा उत्पादकांचा प्रश्न; खा. वाकचौरे यांची केंद्राकडे ठोस मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब राजाराम वाकचौरे यांनी लोकसभेत प्रश्न क्रमांक ३३० डरे कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या गंभीर समस्येकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधले. विशेषतः अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यातील कांदा उत्पादकांना उत्पादन खर्चापेक्षा कमी दर मिळत असल्याने ते मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करत असल्याचे त्यांनी सभागृहात मांडले.

कांद्याला उत्पादन खर्चावर आधारित कायदेशीर किमान आधारभूत किंमत (एमएसपी) लागू करावी, शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत द्यावी, कांदा निर्यात धोरण कायमस्वरूपी व स्थिर ठेवावे तसेच किंमत स्थिरीकरण निधी (पीएसएफ) प्रभावीपणे वापरून शेतकऱ्यांना तातडीचा दिलासा द्यावा, अशी मागणी वाकचौरे यांनी केली. तसेच प्रभावी सरकारी खरेदी व्यवस्था



उभारण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. यावर उत्तर देताना केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकूर यांनी सन २०२५-२६ मध्ये देशात ३०७.३७ लाख मेट्रिक टन कांदा उत्पादनाचा अंदाज असून, त्यापैकी महाराष्ट्रात १५९.२० लाख मेट्रिक टन उत्पादन अपेक्षित असल्याची माहिती दिली. बाजार हस्तक्षेप योजना (एमआयएस), भावांतर भुगतान योजना (पीडीपी) आणि किंमत स्थिरीकरण निधी (पीएसएफ) यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मदत केली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, योजनांच्या घोषणांपेक्षा शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला लाभदायक व हमीभाव मिळणे अधिक महत्त्वाचे असल्याचे सांगत खासदार वाकचौरे यांनी केंद्र सरकारने कांदा खरेदी व निर्यात धोरणाबाबत ठोस आणि दीर्घकालीन निर्णय घेण्याची जोरदार मागणी केली.

## मातापूर विद्यालयात पालक मेळावा उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** मा.खासदार गोविंदरावजी आदिक ग्रामीण शिक्षण संस्था संचलित न्यू इंग्लिश स्कूल, मातापूर येथे इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांचा पालक मेळावा मोठ्या उत्साहात आणि संख्येत संपन्न झाला. सोसाटीचे चेअरमन बाळासाहेब उंडे हे या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी होते. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना चेअरमन उंडे यांनी, ''मातापूर विद्यालयात विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच उत्तम शिस्त आणि संस्कार शिकवले जातात. विद्यालयाचा निकाल उत्कृष्ट असून येथील शिक्षक अतिशय कष्टाळू व प्रामाणिक आहेत. शाळेचा नावलौकिक असाच वाढवण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा आहे,'' असे प्रतिपादन केले. मातापूरचे ग्रामस्थ व उक्कलगाव विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक के. के. उंडे यांच्या सेवानिवृत्तीबद्दल, तसेच कुंडलिक शिरोळे यांची मुख्याध्यापकपदी निवड झाल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविकात मुख्याध्यापक विजय थोरात यांनी शाळेच्या सर्व कामकाजाचा सविस्तर आढावा पालकांसमोर मांडला आणि विविध योजना व प्रश्नांची माहिती दिली. शिक्षक प्रतिनिधी म्हणून ज्येष्ठ शिक्षक . अरविंद थोरात यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमास शालेय उपसमितीचे उपाध्यक्ष बाबासाहेब कासार, पोपटराव उंडे, नामदेव गायके, के. के. उंडे, मुख्याध्यापक कुंडलिक शिरोळे, पत्रकार दिपक उंडे यांच्यासह मोठ्या संख्येने पालक बंधू-भगिनी उपस्थित होते. सुत्रसंचालन व अध्यक्षीय सूचना फासाटे यांनी केले.

## शेतकरी दुध प्रक्रिया सेवा असोसिएशनच्या वतीने FOSTAG प्रशिक्षण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** दूध व दुग्धजन्य पदार्थांमध्ये भेसळ रोखून ग्राहकांना सुरक्षित दूध मिळावे या उद्देशाने वैजापूर येथे FSSAI मान्यताप्राप्त FOSTAG प्रशिक्षण नुकतेच आयोजित करण्यात आले होते.

या प्रशिक्षणात दुध संकलन केंद्र चालक, दूध वाहतूक चालक, कर्मचारी आणि दूध उत्पादक शेतकरी अशा एकूण १३० व्यवसायिकांना या वेळी प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षकांनी वैयक्तिक स्वच्छता, दूधातील भेसळ ओळखणे, शीतसाखळी राखणे आणि अन्न व औषध प्रशासन (FSSAI) चे नवीन कायदे याबाबत सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. सर्वांना प्रशिक्षण प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. प्रशिक्षक म्हणून राहुल महेंद्र केदार, संतोष हिवराळे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी शेतकरी दुध प्रक्रिया सेवा असोसिएशन चे संचालक संदीप बारसे यांनी प्रशिक्षक, FSSAI अधिकारी आणि उपस्थितांचे आभार मानले. दूध हे पूर्णअन्न आहे. आहे तसे ग्रहकांपर्यंत पोहचवने ही दूध उत्पादक, संकलन केंद्र चालक, वाहन चालक, कर्मचारी, डेअरी प्लॅन्ट चालक आपली सर्वांची नैतिक आणि सामाजिक जबादारी आहे ती



आपण प्रामाणिकपणे पार पाडू, यातून दूध व्यवसायाला नक्कीच आणखी सुगीचे दिवस येतील. तसेच याआगोदर पण आपण चांगलाच दूध पुरवठा केलेला आहे पण आता आणखी जोमाने काम करून सर्व नियम पाळून ताजे, स्वच्छ व भेसळमुक्त दूध पुरवण्याचा संकल्प व्यक्त केला. सुरक्षित दूध निरोगी समाज हाच संदेश यावेळी सर्वांना देण्यात आला.

## वांबोरी स्टेशन प्राथमिक शाळेच्या बालदिंडीने परिसर भक्तिमय

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** आषाढी एकादशीच्या निमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वांबोरी स्टेशन येथे पारंपरिक बालदिंडी व ग्रंथदिंडी उत्साहात पार पडली. ''जय जय राम कृष्ण हरी, ज्ञानेश्वर माऊली तुकाराम'' या नामगजरात निघालेल्या दिंडीत विद्यार्थ्यांनी संतांच्या वेशभूषेत सहभागी होत वारकरी परंपरेचे दर्शन घडविले. टाळ-मृदंगाच्या गजरात विठ्ठल-रखुमाई, संत ज्ञानेश्वर, तुकाराम, निवृत्तीनाथ, सोपानदेव, मुक्ताई आणि जनाबाई यांच्या वेशातील विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. आकर्षक बैलगाडी, ग्रंथदिंडी, ज्ञानेश्वरी व तुकाराम गाथेचे पूजन तसेच श्री साई मंदिर परिसरातील रांगोळी व फुलांच्या सजावटीने कार्यक्रमाची शोभा वाढविली.कार्यक्रमानंतर विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांसाठी अल्पोपहाराचे आयोजन करण्यात आले. पुढील वर्षीच्या दिंडीच्या भोजन व्यवस्थेची जबाबदारी राहुल हरिश्चंद्रे व जालिंदर जाधव यांनी स्वीकारली. मुख्याध्यापिका उषा पवार, चारुशीला रायकर, कानिफनाथ बनकर, राहुल लोंढे, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ व माजी विद्यार्थ्यांनी आयोजनासाठी परिश्रम घेतले. केंद्रप्रमुख रविंद्र बोरुडे व गटशिक्षणाधिकारी जयश्री कार्ले यांनी उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.



## जलदगती कालव्यातून पाणी सोडले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** ऊर्ध्व गोदावरी खोऱ्यात होत असलेल्या पावसामुळे गोदावरी नदीमधील अतिरिक्त पाणी २१ जुलैला नांदूर मधमेश्वर जलदगती कालव्यात सोडण्यात आले आहे. हे पाणी ४०० ते ६०० क्यूसेक या विसर्गाने कालव्यात सोडण्यात आले असून त्यामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. सध्या तालुक्यात तसेच धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये सतत पाऊस सुरु आहे. या सततच्या पावसामुळे नदी, नाले, ओढे यातील पाणी पातळी झपाट्याने वाढत आहे. गोदावरी नदीचे अतिरिक्त पाणी कालव्यात सोडण्यात आल्याने कोपरगावसह वैजापूर व गंगापूर तालुक्याच्या लाभ क्षेत्रातील गावांना या पाण्याचा फायदा मिळणार आहे. मात्र हे पाणी किती दिवस सुरु राहणार याबाबत अद्याप स्पष्टता नसून नांदूर मधमेश्वर पाटबंधारे विभागाने याबाबत तहसीलदारांना कळवले असून विसर्गात होणारी वाढ लक्षात घेता कार्यक्षेत्रातील सर्व ग्रामपंचायती, ग्रामसेवक, तलाठी, पोलीस पाटील व संबंधित यंत्रणांना तात्काळ सतर्क करण्याबाबत सुचवण्यात आले आहे. याशिवाय, याबाबत आवश्यक्तेनुसार नागरिकांनाही सतर्कतेच्या सूचना द्याव्यात असे नांदूर मधमेश्वर पाटबंधारे विभागाचे उप कार्यकारी अभियंता यांनी तहसीलदारांना पत्र पाठवून कळवले आहे.

## विद्यापीठ प्रकल्पग्रस्त उमेदवारांची कागदपत्रांची पडताळणी होणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** मफुकृ विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील अहिल्यानगर पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, धुळे, नंदुरबार व जळगाव या जिल्ह्यातील ज्या प्रकल्पग्रस्तांनी प्रत्यक्षात महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी या प्रकल्पाकरीता जमिनी दिलेल्या आहेत अशा प्रकल्पग्रस्त कुटुंबातील उमेदवारांना सरळसेवेने रिक्त पदांवर भरती करण्यासाठी शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार दि. ३१ डिसेंबर २०२४ रोजी विद्यापीठ प्रकल्पग्रस्तांसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदरच्या जाहिरातीमधील गट क व गट ड या संवर्गातील एकुण १४ पदांच्या टी.सी.एस. या कंपनीमार्फत दि. १६ मार्च, २०२६ ते १८ मार्च, २०२६ या कालावधीत लेखी परिक्षा घेण्यात आल्या होत्या. या परिक्षेच्या प्राप्त निकालाच्या आधारे विद्यापीठ प्रशासनाने प्रकल्पग्रस्त उमेदवारांचे पदनिहाय निवड यादी व प्रतिक्षा यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. याबाबत संबंधीत उमेदवारांना बुधवार दि. २९ जुलै रोजी कागदपत्रे पडताळणीसाठी विहीत वेळेत उपस्थित राहण्याबद्दल विद्यापीठ प्रशासनामार्फत कळविण्यात आले आहे.

## निधन वार्ता

### माजी सैनिक निवृत्ती गवळी



**वडाळा महादेव :** निवृत्ती गणपत गवळी (वय ८४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्च्यात पत्नी मुले ४ मुलगी १ सुना नातवंडे जावई असा मोठा परिवार आहे. भारतीय सैन्य दलात त्यांनी १८ वर्ष कर्तव्य बजावले येथील सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ गवळी, भाजपाचे भारत गवळी, चंद्रकांत गवळी, सुर्यकांत गवळी, जयश्री खैरनार यांचे ते वडील होत.

## खिर्डी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेवर पुन्हा एकदा सत्ताधाऱ्यांच्या हातात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** तालुक्यातील खिर्डी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेवर पुन्हा एकदा सत्ताधाऱ्यांनी वर्चस्व कायम ठेवत पाच बिनविरोध जागेसह अन्य आठ जागांवरही विजय मिळवला आहे. येथील जिल्हा प्राथमिक शाळेत (दि.११) जुलै रोजी ही निवडणूक प्रक्रिया पार पडली. २२४ सभासदांपैकी २०१ सभासदांनी मतदानाचा हक्क बजावला. यापूर्वी सत्ताधारी गटाच्या पाच उमेदवारांची बिनविरोध निवड करण्यात आली होती. उर्वरित जागांसाठी घेण्यात आलेल्या मतदानामध्ये आठ जागांसाठी नऊ उमेदवार रिंगणात होते. यामध्ये सत्ताधारी पक्षाचे आठही उमेदवार निवडून आले तर विरोधकांना पराभव पत्करावा लागला. हरिभाऊ गुरसळ १८२, बाळासाहेब पारखे १८८, विनय पवार १८७, बाबासाहेब येळे १८७, हरिभाऊ रेवाळे १८३, कल्याण लाकडे १८४, अक्षय विटनोर १६९, भास्कर हळनोर १७७मतांनी विजयी झाले. तर भरत गंगाधर जाधव यांना अवघ्या ४३ मतांवर समाधान मानावे लागले. तर शनैश्वर पाराजी पवार, आसाराम फकीरा पिसाळ, अरुण पंढरीनाथ कांबळे, मंदाबाई रावसाहेब जाधव, सिंधुबाई भगीरथ पवार यांची यापूर्वीच बिनविरोध निवड करण्यात आली होती.निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून आर. आर. जाधव यांनी काम पाहिले तर त्यांना संस्थेचे सचिव कैलास सोमवंशी यांनी सहकार्य केले. माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकसेवा विकास आघाडीने गेल्या २५ वर्षांपासून या सेवा सोसायटीवर आपली सत्ता कायम ठेवली असून माजी आ. मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे शनैश्वर पवार कामकाज सांभाळत आहेत. यावेळी विजयी उमेदवारांचा सत्कार करण्यात आला.

## द्रोणा अकॅडमीत अवतरली पंढरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** राहाता तालुक्यातील साकुरी येथील अशोकराव दामोधर दंडवते पाटील ग्रामीण शैक्षणिक प्रतिष्ठानच्या द्रोणा स्कूलमध्ये आषाढी एकादशी निमित्त भक्तीमय वातावरणात दिंडी काढण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष जयराज दंडवते, संचालिका प्राजक्ताताई दंडवते, उपाध्यक्ष अनुप दडवते, प्राचार्या अनिता रोहोम, शिक्षक शिक्षिका, उपस्थित होते. प्रमुख पाहुणे संस्थेचे अध्यक्ष जयराज दंडवते, संचालिका प्राजक्ताताई दंडवते,उपाध्यक्ष अनुप दंडवते यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीचे पूजन करण्यात आले. चिमूरड्या विद्यार्थ्यांनी सुद्धा विठ्ठल रुक्मिणी वारकरी यांचा वेश परिधान केला होता. यावेळी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे अध्यक्ष जयराज दंडवते व संचालिका प्राजक्ताताई दंडवते यांनी फुगडी व दिंडीमध्ये सहभाग घेतला.



सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

शनिवार दि .२५ जुलैं २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२६<br>१८०<br>११७ | ९-५ | २३०<br>७८०<br>०९० | जोड<br>९८-१५-३६-४७-५२ |

**कल्याण**

उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १५६<br>२४६<br>६६० | २-४ | १४९<br>१३०<br>११२ | जोड<br>२०-९४-८१-७६-४५ |

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२७<br>२८०<br>२२६ | ०-८ | १७०<br>१८९<br>११६ | जोड<br>०४-३८-१७<br>२६-८९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 9 | | | | |

# महापालिका सभेत नगरसेवक आक्रमक

## मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा अन्यथा अधिकाऱ्यांच्या घरी सोडू : कोतकर । सभागृहात अमोल येवलेंचा 'भोंगा'

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महानगरपालिकेची महासभा महापौर ज्योतीताई गाडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. महासभेत नगरसेवकांनी शहरातील विविध नागरी प्रश्नांवर प्रशासनाला धारेवर धरत तीव्र नाराजी व्यक्त केली. मोकाट कुत्र्यांचा वाढता उपद्रव, शिक्षण व्यवस्था, महापालिकेच्या शाळांची अवस्था, जन्म-मृत्यू दाखल्यांतील नोंदी, घरपट्टी पुनर्मूल्यांकन, पथदिवे, सभागृहाची दुरवस्था, सार्वजनिक सुविधा, धोकादायक शाळा इमारती, रस्त्यांवरील खड्डे, प्रोफेसर चौक व्यापारी संकुल, भारत गॅस पाइपलाइनसाठी होणारी रस्ते खोदाई अशा अनेक विषयांवर जोरदार चर्चा झाली.

यावेळी सभागृहात बोलण्याची संधी दिली जात नसल्याचा आरोप करत नगरसेवक अमोल येवले यांनी भोंगा आणून निषेध व्यक्त केला. त्यामुळे काही काळ सभागृहात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

महासभेत मोकाट कुत्र्यांच्या प्रश्नावर नगरसेवकांनी तीव्र संताप व्यक्त केला. शहरात मोठ्या प्रमाणात मोकाट कुत्र्यांचा वावर असून नागरिकांवर जीवघेणे हल्ले होत असल्याचे सदस्यांनी निदर्शनास आणून दिले.

यावेळी नगरसेवक मनोज कोतकर यांनी प्रशासनावर जोरदार टीका करत, महापालिकेने मोकाट कुत्र्यांबाबत कोणतीही प्रभावी उपाययोजना केली नाही. नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. आता प्रशासनाने तातडीने कारवाई केली नाही तर आम्ही अधिकाऱ्यांच्या घरीच मोकाट कुत्रे सोडू, असा इशारा दिला. विविध नगरसेवकांनी आपल्या प्रभागातील मोकाट कुत्र्यांच्या समस्यांकडे लक्ष वेधत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.



तहकूब महासभेत नगरसेवक डॉ. सागर बोरुडे यांनी जन्मदाखल्यांबाबत सुमारे १५ हजार डुप्लिकेट नोंदी असल्याचा मुद्दा उपस्थित केला. यावर डॉ. सतीश राजूरकर यांनी स्पष्ट केले की, १७ हजार नोंदी या दुबार असल्याचे म्हणता येणार नाही. जुन्या नोंदींच्या दुरुस्तीमुळे त्या वाढल्या असून समितीमार्फत तीन महिन्यांत सर्व नोंदींची पडताळणी केली जाईल. आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले की, २०२६ मध्ये टठ उेवश असलेल्या जन्मदाखल्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली असून ही परिस्थिती संपूर्ण राज्यात आहे. समितीमार्फत तपासणी करून अहवाल सादर करण्यात येईल.

डॉ. सागर बोरुडे यांनी जन्म-मृत्यू विभागात कर्मचारी अपुरे असल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचा मुद्दा उपस्थित केला. यावर आयुक्तांनी सांगितले की, महापालिकेतील ९८ टक्के लिपिक वर्ग सध्या डखठ कामात गुंतलेला असून पुढील १५ दिवसांत कर्मचारी उपलब्ध झाल्यानंतर प्रलंबित कामे पूर्ण केली जातील.

नगरसेवक संपत बारस्कर यांनी सभागृहातील पाणी गळती, राष्ट्रगीतावेळी उभे राहताना होणारी अडचण, टेबलांची दयनीय अवस्था आणि लोंबकळणाऱ्या विद्युत तारा यावर तीव्र नाराजी व्यक्त केली.

हा विषय अनेक वेळा मांडला आहे. प्रत्येक वेळी आश्वासने दिली जातात; पण प्रत्यक्षात काहीच होत नाही, असे त्यांनी सांगितले. शहर अभियंता मनोज पारखे यांनी सभागृहाच्या दुरुस्तीसाठी वाढीव निधीसह काम करण्याचा निर्णय झाल्याची माहिती दिली.

यावर संपत बारस्कर व माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनी, तुमचे वायरमन झोप काढतात का? लोंबकळणाऱ्या वायरांसाठी पैसे घेतले जातात का? असा सवाल उपस्थित केला. फक्त आश्वासने देऊ नका. चुकीचे अंदाजपत्रक का तयार झाले, याचे उत्तर द्या, अशी मागणीही बारस्कर यांनी केली. नगरसेवक निखिल वारे यांनी शाळांपासून ५०० मीटर परिसरात तंबाखू व मादक पदार्थांची विक्री होत असल्याचा गंभीर मुद्दा उपस्थित केला. शिक्षण मंडळाने याबाबत काय कारवाई केली? शाळा आणि अन्न व औषध प्रशासनाला पत्र दिले का? आयुक्तांनीही यावर पांघरूण घालू नये. शिक्षण मंडळाची जबाबदारी नाकारता येणार नाही, असे त्यांनी सांगितले.

## द•ख•ल

### माळीवाड्यात ७२ वर्षीय वृद्धावर प्राणघातक हल्ला; सहा जणांविरुद्ध गुन्हा

**अहिल्यानगर :** शहरातील माळीवाडा भागातील ब्राम्हण गल्लीमध्ये एका ७२ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला बेदम मारहाण करून त्यांच्या गळ्यातील सोन्याचा बदाम व रोख रक्कम लुटल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ब्राम्हण गल्ली येथील रहिवासी केरप्पा रामचंद्र हुच्चे (वय ७२) हे २१ जुलै रोजी रात्री आपल्या घरी असताना, मध्यरात्री १२ ते १२:३० वाजण्याच्या सुमारास काही तरुण त्यांच्या घरासमोर उभे राहून जोरात आरडाओरडा व शिवीगाळ करत होते. घराबाहेर अचानक सुरू असलेला गोंधळ ऐकून केरप्पा हुच्चे हे नक्की काय प्रकार घडला आहे हे पाहण्यासाठी घराबाहेर आले. त्यांनी तरुणांना शिवीगाळ न करण्याबाबत विचारणा केली. याचा राग धरून टोळक्यातील आरोपी कृष्णा भागानगरे, ओंकार घोलप, शिवम घोलप, भय्या बिडकर, आदित्य करमाळकर आणि दर्शन बोरा यांनी फिर्यादी यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर आरोपींनी फिर्यादी यांच्यावर लोखंडी गजाने प्राणघातक हल्ला करून त्यांना जबर मारहाण केली. मारहाणीदरम्यान आरोपींनी हुच्चे यांच्या गळ्यातील साडेतीन ग्रॅम वजनाचा सोन्याचा बदाम आणि खिशातील ३५० रुपयांची रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेतली व तेथून पळ काढला. या घटनेनंतर पीडित ज्येष्ठ नागरिकाने कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून सहा आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पो. नि. नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पो. उ.नि. गणेश देशमुख अधिक तपास करत आहेत.

### रिक्षाचालकाची दोन मजुरांना मारहाण ३९ हजारांचा ऐवज लांबवला

**अहिल्यानगर :** केडगाव लिंक रोडवर एका निर्जन स्थळी अनोळखी रिक्षाचालकाने दोन मजुरांना बेदम मारहाण करत लुटल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. या घटनेत चोरट्याने रोख रकमेसह मोबाईल व चांदीची साखळी असा एकूण ३९ हजार रुपयांचा मुद्देमाल जबरदस्तीने हिसकावून पोबारा केला. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात रिक्षाचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शाहूनगर (केडगाव) येथे राहणारे गवंडी कामगार बादल भारत रामरज्जत आणि त्यांचे मित्र गुन्हागार राम निषाद हे दोघे २१ जुलैच्या रात्री दहा वाजेच्या सुमारास लिंक रोडने जात होते. त्यावेळी एका अनोळखी रिक्षाचालकाने आपली रिक्षा एका निर्जन ठिकाणी थांबवली. त्यानंतर त्याने बादल रामरज्जत आणि गुन्हागार निषाद या दोघांशी वाद घालत त्यांना शिवीगाळ केली. रिक्षाचालकाने दोघांनाही लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिली. यानंतर त्याने बादल यांच्या जवळील १० हजार रुपये रोख आणि ५०० रुपयांचा मोबाईल, तर गुन्हागार निषाद यांच्या जवळील ११ हजार रुपये रोख, ९ हजार ५०० रुपये किंमतीची चांदीची साखळी आणि ८ हजार रुपयांचा मोबाईल असा एकूण ३९ हजार रुपयांचा ऐवज जबरदस्तीने काढून घेतला व तेथून पळ काढला. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात बादल रामरज्जत यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदवण्यात आला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे व पो. नि. नितीन देशमुख यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणाचा पुढील तपास स. पो. नि. कुणाल सपकाळे करत आहेत.

### भोसे सेवा संस्थेच्या अध्यक्षपदी बांगर

**करंजी :** भोसे व दगडवाडी या ग्रुप सहकारी सेवा सोसायटीच्या अध्यक्षपदी प्रल्हाद शंकर बांगर यांची सहाव्यांदा निवड करण्यात आली. तर जिल्हा सहकारी बँक निवडणुकीसाठी यावेळी श्री रंगनाथ आंधळे यांचे निवड करण्यात आली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक ई एस राठोड यांनी काम पाहिले. या निवडणुकीदरम्यान विलास टेमकर, भाऊसाहेब शिंदे, विठ्ठल टेमकर, साईनाथ जोगदंड, बंडू शिंदे, विश्वनाथ शिंदे, रंगनाथ पवार, कान्हु साळवे, अंबादास शिंदे यांसह संस्थेचे सभासद भाऊसाहेब टेमकर, सुरेश टेमकर, मोहन वारे यांसह ग्रामस्थ उपस्थित होते.



### श्री.नाथ विद्या मंदिरात पारंपरिक दिंडी सोहळा



**अहिल्यानगर :** वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे श्री. नाथ विद्या मंदिरातील बालकांनी आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त परिसरात पारंपरिक दिंडी सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण, भक्तिमय आणि संस्कारमय वातावरणात संपन्न झाला. विठ्ठल नामाच्या अखंड गजराने परिसर दुमदुमून गेला. टाळ, मृदुंग, भगव्या पताका, संतांच्या अभंगांचा निनाद आणि वारकरी संप्रदायाची परंपरा यामुळे संपूर्ण परिसर पंढरपूरच्या वारीचे जिवंत दर्शन घडवत होता.

## शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सेवा पोहोचणे ही काळाची गरज : डॉ. गिऱ्हे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** दुर्गम आणि वंचित भागातील नागरिकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्याच्या उद्देशाने उमंग फाऊंडेशनच्या वतीने आगडगाव (ता. नगर) येथील आदिवासी वस्तीवर मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये महिला, पुरुष आणि ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यासोबतच गरजू महिला व पुरुषांना कपड्यांचे वाटप करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविण्यात आले. या उपक्रमाला आदिवासी समाजातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



आदिवासी समाजामध्ये आरोग्याबाबत जनजागृती निर्माण करणे, प्राथमिक आरोग्य तपासणीद्वारे विविध आजारांचे वेळेत निदान करणे आणि गरजू कुटुंबांना आवश्यक मदत उपलब्ध करून देणे हा या शिबिरामागील प्रमुख उद्देश होता. या आरोग्य शिबिराचे उद्घाटन उमंग फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. संतोष गिऱ्हे यांच्या हस्ते झाले. यावेळी ॲड. पोपट बनकर, राम कराळे, शाहीर कान्हू सूंबे, सरपंच परमेश्वर पालवे, वैशाली कुलकर्णी, कावेरी भिंगारदिवे, गणेश कदम, भीमराज भिंगारदिवे, भाऊसाहेब ठोंबे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. डॉ. संतोष गिऱ्हे म्हणाले की, समाजातील प्रत्येक घटकापर्यंत आरोग्य सेवा पोहोचणे ही काळाची गरज आहे.

## 'ज्ञानबा-तुकाराम'च्या गजरात दिंडी प्रदक्षिणा



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**तिसगाव :** आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर कानिफनाथ विद्यालय, निवडुंगे येथे वारकरी परंपरेचा वारसा जपत भव्य दिंडी प्रदक्षिणा सोहळा अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि 'ज्ञानबा-तुकाराम'च्या अखंड नामघोषात संपूर्ण परिसर विठ्ठलमय झाला होता. विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध सहभागाने आणि भक्तिभावाने उपस्थितांची मने जिंकली.

विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेशभूषा परिधान करून दिंडीत सहभाग घेतला. डोक्यावर तुळशीवृंदावन घेतलेल्या विद्यार्थिनी तसेच हातात पताका व टाळ घेऊन सहभागी झालेल्या बालवारकऱ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत मीराबाई तसेच विठ्ठल-रुक्मिणी यांच्या जिवंत देखाव्यांनी कार्यक्रमाची शोभा अधिक खुलवली.विद्यालयाच्या प्रांगणात पालखी व ग्रंथपूजन करून दिंडीला प्रारंभ करण्यात आला. गावातून निघालेल्या दिंडीदरम्यान 'ज्ञानबा-तुकाराम' आणि 'विठ्ठल-रुक्मिणी'च्या जयघोषाने वातावरण भक्तिमय झाले. ग्रामस्थांनी विविध ठिकाणी पालखीचे पूजन करून दिंडीचे उत्स्फूर्त स्वागत केले. या दिंडीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी सामाजिक संदेशही प्रभावीपणे दिला. 'झाडे लावा - झाडे जगवा', 'बेटी वाचवा - बेटी शिकवा', 'स्वच्छ भारत अभियान' आणि 'पर्यावरण रक्षण' यांसारख्या विषयांवरील फलक हातात घेऊन विद्यार्थ्यांनी जनजागृती केली.विद्यार्थ्यांमध्ये महाराष्ट्राची संस्कृती, वारकरी परंपरा आणि सामाजिक मूल्यांची रुजवण करणारा हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## नागवडे स्कूलच्या आषाढी दिंडीत विठ्ठलभक्तीचा जल्लोष



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठान संचलित शिवाजीराव नागवडे डॅफोडील्स स्कूल व कौशल्यादेवी नागवडे इंग्लिश मीडियम स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आषाढी दिंडी सोहळा भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. माऊली-माऊलीच्या अखंड नामघोषासह टाळ-मृदुंगाच्या निनादाने परिसर विठ्ठलमय झाला. या सोहळ्यात विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

शाळेतून निघालेली दिंडी बगाडे कॉर्नर, शनी चौक मार्गे श्रीगोंद्याचे ग्रामदैवत सद्गुरू श्री संत शेख महंमद महाराज मंदिर येथे पोहोचली. मंदिर प्रांगणात पार पडलेल्या रिंगण सोहळ्याने वारकरी परंपरेचे दर्शन घडविले आणि उपस्थितांना भक्तीचा अनोखा अनुभव दिला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बी. के. लगड होते. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, केंद्रप्रमुख उत्तरेश्वर मोहोळकर आणि कैलास खेतमाळीस उपस्थित होते. यावेळी पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी विज्ञान आणि वारी परंपरेतील मूल्यांचा संगम विद्यार्थ्यांसमोर उलगडून सांगितला, तर बी. के. लगड यांनी वारीचे सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व विशद करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संस्कार व सामाजिक बांधिलकीची जाणीव दृढ होत असल्याचे सांगितले.



## यशवंत विद्यालय शिराळ येथे दिंडी सोहळा उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिराळ चिचोंडी :** विद्यार्थ्यांमध्ये संत परंपरेचा वारसा भक्ती संस्कार शिस्त समताआणि सामाजिक ऐक्याची भावना रुचवणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन यशवंत विद्यालय मुख्याध्यापक नानासाहेब काळे यांनी केले. आषाढी एकादशीच्यापावन पर्वा निमित्तपंढरपूरच्या विठुरायाच्या दर्शनासाठी लाखो वारकरी भक्ती भावाने पंढरीच्या दिशेने मार्गस्थ होत असतानाच शिराळ येथील यशवंत विद्यालय शिराळच्याविद्यार्थ्यांनी पायीदिंडी सोहळ्याचेआयोजन करण्यात आले भक्तीमय वातावरणात पार पडलेल्या या दिंडी सोहळ्यामुळे संपूर्ण परिसर विठ्ठल नाम घोष टाळ मृदंगाचा गजर आणि अभंगाच्या स्वरांनी दुमदुमून गेला. या दिंडी सोहळ्यात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत वारकरी वेशभूषा परिधान केली होती अनेक विद्यार्थी विठ्ठल रुक्मिणीच्या वेशात सहभागी झाले होते. हातात भगव्या पताका गळ्यात टाळ मृदुंगाचा निनाद आणि मुखातून निघणारा ज्ञानोबा तुकाराम जय जय राम कृष्ण हरी विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठलाच्या जयघोष यामुळे दिंडीला पंढरीच्या वारीचे स्वरूप प्राप्त झाले होते. दिंडी सोहळ्यात विर्द्याध्यांनी सादर केलेले रिंगणपावली फुगडी तसेच बाल वारकऱ्यांनी सादर केलेल्या अभंग उपस्थितांचे विशेष आकर्षण ठरले यावेळीगावातीलभाविक ग्रामस्थ प्राध्यापक काळे सर शिक्षक हरिभाऊ दगडखैर शेख सर ज्योती क सर भापकर सर साळवे अशोकमुळे दुशिंग मॅडम घुणे सर आदी उपस्थित होते उपस्थिती ना महाप्रसाद ' वाटपकरण्यात आले.

## वीजप्रश्नावरून उद्रेक : कामत शिंगवे ग्रामस्थांचे तहसीलसमोर उपोषण



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**तिसगाव :** पाथर्डी तालुक्यातील कामते शिंगवे येथील ग्रामस्थांनी गावातील वीजपुरवठ्याच्या गंभीर समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले. स्वतंत्र गावठाण फिडर, नवीन डीपी (ट्रान्सफॉर्मर) आणि सुरळीत वीजपुरवठा या प्रमुख मागण्यांसाठी ग्रामस्थांनी हे आंदोलन छेडले आहे.

गावातील वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांसह शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. महावितरणकडे वारंवार निवेदने देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने अखेर उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

सरपंच गौतम कराळे यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या आंदोलनात ग्रामस्थांनी महावितरण प्रशासनाविरोधात घोषणाबाजी करत तीव्र नाराजी व्यक्त केली. आंदोलनकर्त्यांनी जबाबदार अधिकारी व संबंधित कंत्राटदारांवर कारवाई करण्याची मागणी केली असून, मागण्या पूर्ण होईपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा इशाराही दिला आहे. अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.

या उपोषणात बाळासाहेब कराळे, सुनील कराळे, माणिक कराळे, सुनील मिरपगार , अर्जुन कराळे, बापू कराळे, वसंत मिरपगार , राजेंद्र भोसले , अर्जुन दारकुंडे, भाऊसाहेब डोळसे , राजाराम कराळे, संकेत कराळे, पार्थ कराळे, कानिफ पाटेकर यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ सहभागी झाले.

## ग्रामपंचायतीत नेमके दडविले काय ? माहिती देण्यास टाळाटाळ

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव : ठाकूर निमगाव ग्रामपंचायतीच्या विविध विकासकामांबाबत माहिती मागवूनही कायदेशीर मुदत उलटून गेल्यानंतरही माहिती उपलब्ध करून देण्यात आली नसल्याचा आरोप करत पत्रकार लक्ष्मण मडके आणि उद्योजक साईनाथ कातका यांनी थेट मंत्रालयासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे धाव घेतली आहे. या तक्रारीमुळे ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून, संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदारांनी सर्वप्रथम ग्रामपंचायतीकडे रीतसर अर्ज करून विविध विकासकामांची अधिकृत माहिती, अंदाजपत्रके, मोजमाप पुस्तिका (एम.बी.), मालमत्ता नोंदवही, खरेदी प्रक्रिया, बिले, देयके आणि इतर आवश्यक कागदपत्रांची मागणी केली होती. मात्र कायद्यानुसार माहिती देण्याची मुदत संपूनही संबंधित ग्रामसेवकांकडून माहिती उपलब्ध करून देण्यात आली नसल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.

माहिती वेळेत न मिळाल्याने प्रकरण केवळ माहितीपुरते मर्यादित न ठेवता, महाराष्ट्र शासन (मंत्रालय), जिल्हाधिकारी अहिल्यानगर, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर आणि गटविकास अधिकारी पंचायत समिती शेवगाव यांच्याकडे स्वतंत्र तक्रार अर्ज दाखल करण्यात आला आहे. या अर्जामध्ये ग्रामपंचायतीच्या विविध विकासकामांची संपूर्ण प्रशासकीय व तांत्रिक चौकशी करून सत्यस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



तक्रारदारांनी आपल्या अर्जात ग्रामपंचायतीतील विकासकामांच्या कागदपत्रांची सखोल पडताळणी, प्रत्यक्ष स्थळ तपासणी, कामांच्या नोंदींची छाननी, निधीच्या वापराचा तपशील तसेच संबंधित सर्व अभिलेखांची तपासणी करण्याची मागणी केली आहे. याशिवाय आवश्यक असल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, कायद्यानुसार मागितलेली माहिती वेळेत का देण्यात आली नाही? माहिती देण्यास झालेला विलंब हा केवळ प्रशासकीय हलगर्जीपणा आहे की त्यामागे अन्य काही कारण आहे, असा प्रश्न आता ग्रामस्थांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे. माहिती न दिल्यामुळे ग्रामपंचायतीच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत असून, संपूर्ण कारभाराची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

पत्रकार लक्ष्मण मडके आणि उद्योजक साईनाथ कातकडे यांनी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या तक्रारीची गांभीर्याने दखल घेऊन संपूर्ण प्रकरणाची चौकशी करावी, दोष आढळल्यास नियमानुसार कठोर प्रशासकीय कारवाई करावी आणि ग्रामपंचायतीचा कारभार पूर्णपणे पारदर्शक करावा, अशी मागणी केली आहे.

आता या तक्रारीनंतर मंत्रालय, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती स्तरावरून कोणती भूमिका घेतली जाते, चौकशीचे आदेश दिले जातात का आणि ग्रामपंचायतीकडून मागविलेली कागदपत्रे सार्वजनिक केली जातात का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

द•ख•ल

## खेळाडूंचा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते गौरव



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**बारामती / सोमेश्वरनगर:** बांगलादेशातील ढाका येथे नुकत्याच पार पडलेल्या दक्षिण आशियाई कराटे क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या बारामतीतील जिल्हा क्रीडा संकुल पुणे बारामती येथे सराव करणारी श्रुती करळे आणि आयुष करळे या खेळाडूंचा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, तालुका क्रीडा अधिकारी संतोष लवटे, महेश चावले, प्रशिक्षक रवी करळे आदी उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांनी दोन्ही खेळाडूंचा सत्कार करून त्यांच्या यशाबद्दल अभिनंदन केले. आंतरराष्ट्रीय स्तरावरील या कामगिरीबद्दल कौतुक व्यक्त करत त्यांनी भविष्यातील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

## पोंदेवाडीत १३५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व दप्तरांचे मोफत वाटप



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** पोंदेवाडी (ता. आंबेगाव) येथे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री कै. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त पोंदेवाडी राष्ट्रवादी काँग्रेस कमिटीच्या वतीने गुरुवार (दि. २३) रोजी सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी पोंदेवाडी येथील माध्यमिक विद्यालय व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील एकूण १३५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व दप्तरांचे मोफत वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाचे उद्घाटन मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती निलेश स्वामी थोरात यांच्या हस्ते झाले यावेळी पंचायत समिती सदस्या अंकिता वाळुंज, खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष अनिल वाळुंज, माजी उपसरपंच संदीप पोखरकर, महेंद्र पोखरकर, अमोल वाळुंज, आनंदराव पोंदे, निलेश मांजरे, अशोक दुगड, शिवराम दादा पोखरकर, अनिल गावडे, आप्पासाहेब इखे , अर्जुन महाराज वाळुंज उपस्थित होते विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी आवश्यक शालेय साहित्य व दप्तरांचे वितरण करण्यात आल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे पालक, शिक्षक व ग्रामस्थांनी स्वागत केले. यावेळी दोन्ही शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पोंदेवाडी राष्ट्रवादी काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी, स्थानिक ग्रामस्थ तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## तळेगाव ढमढेरे येथे दारुच्या बाटलीने युवकाला मारहाण

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :**तळेगाव ढमढेरे (ता. शिरुर) येथील एका हॉटेलमध्ये किरकोळ कारणावरून युवकाच्या डोक्यात दारुची बाटली मारुन जखमी केल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे तेजस शिंदे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तळेगाव ढमढेरे (ता. शिरुर) येथील डी एस बार या हॉटेलमध्ये प्रसाद ताठे व शुभम भुजबळ हे दोघे दारू पीत बसलेले असताना तेथे आलेल्या तेजस शिंदे व शुभम भुजबळ या दोघांमध्ये वादावादी झाल्याने प्रसाद ताठे हा तेजसला समजावून सांगत असताना तेजस याने प्रसादला शिवीगाळ, दमदाटी करत हाताने लाथाबुक्क्यांनी तसेच दारुची बाटली प्रसादच्या डोक्यात मारून जखमी केले, याबाबत प्रसाद तुकाराम ताठे (वय ३२ वर्षे रा. तळेगाव ढमढेरे ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी तेजस शिंदे ( पुण नाव पत्ता माहिती नाही ) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रशांत गायकवाड हे करत आहे.

## रांजणगाव येथे सोने चांदीच्या दुकानातून दागिन्यांची चोरी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** रांजणगाव गणपती (ता. शिरुर) येथील एका सोनाराच्या दुकानात खरेदीसाठी आलेल्या चार अज्ञात महिलांनी सोनाराच्या दुकानातील चांदीचे दागिने लांबल्याची घटना घडली असल्याने रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे चार अज्ञात महिलांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.रांजणगाव गणपती (ता. शिरुर) येथील महावीर ज्वेलर्सचे दुकान चालक प्रणय वर्मा हे दुकानात असताना चार महिला दुकानात आल्या त्यांनी चांदीच्या जोडव्यांची मागणी केली, बरेच वेळ दुकानात दागिने पाहिल्यानंतर सदर महिला काहीही खरेदी न करता निघून गेल्या, काही वेळाने प्रणय हे दुकानातील वस्तूची पाहणी करत असताना त्यांना दुकानात प्लास्टिक पिशवीमध्ये ठेवलेले तब्बल ८२ नग चांदीचे जोडवे नसल्याचे निदर्शनास आले, दरम्यान दुकानात खरेदीसाठी आलेल्या महिलांनी चोरी केल्याचे लक्षात आल्याने प्रणय दिलीप वर्मा (वय ३० वर्षे रा. भांबर्डे रोड रांजणगाव गणपती ता. शिरुर जि. पुणे) यांनी याबाबत रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी चार अज्ञात महिलांवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार अमित चव्हाण हे करत आहे.

# बारामती नगरपरिषदेच्या अत्याधुनिक सीवर सक्शन-जेटिंग-डीवॉटरिंग मशीनचे लोकार्पण...!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामती शहराची स्वच्छता व्यवस्था अधिक आधुनिक, सुरक्षित आणि कार्यक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत बारामती नगरपरिषदेला प्राप्त झालेल्या अत्याधुनिक कंबाईंड सीवर सक्शन, जेटिंग व डीवॉटरिंग मशीनचे लोकार्पण राज्याच्या उपमुख्यमंत्री आदरणीय सुनेत्रा वहिनी पवार यांच्या शुभहस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. सुमारे १ कोटी रुपये किमतीचे हे अत्याधुनिक मशीन स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणारे असून, शहरातील खोल मॅनहोल, भूमिगत गटारे, सिव्हर लाईन, सेप्टिक टाक्या आणि आपत्कालीन पाणी उपसा यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. राज्य शासनाच्या मॅनहोलकडून मशीनहोलकडे या योजनेअंतर्गत उपलब्ध झालेल्या या मशीनमुळे आता स्वच्छता कर्मचाऱ्यांना जीव धोक्यात घालून गटारात उतरावे लागणार नाही. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने स्वच्छता अधिक सुरक्षित, जलद आणि प्रभावीपणे केली जाणार आहे.



यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी पवार यांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याची गरज अधोरेखित करत, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना अधिक दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याचा शासनाचा निर्धार व्यक्त केला. बारामतीच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन या अत्याधुनिक मशीनसाठी नगराध्यक्ष सचिन सातव, आरोग्य सभापती नवनाथ बल्लाळ आणि मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने ही सुविधा बारामतीला उपलब्ध झाली. या प्रसंगी नगराध्यक्ष सचिन सातव, उपनगराध्यक्ष श्वेता नाळे, मुख्याधिकारी पंकज भुसे, आरोग्य सभापती नवनाथ बल्लाळ, आरोग्य प्रमुख स्वरूप आहिवळे, आरोग्य निरीक्षक अजय लालबिगे, उपमुख्याधिकारी तथा वाहन विभाग प्रमुख योगिता दरेकर, नगरसेवक संजय संघवी, अमर धुमाळ, विशाल हिंगणे, आरती शेंडगे, अनुप्रिता डांगे-ताबे, प्रवीण माने, राजेंद्र सोनवणे, गोरख पारसे, अविनाश निकाळजे, सोमनाथ गजाकस, गणेश जोजारे, समीर चव्हाण, अक्षय डांगे, योगेश नाळे तसेच नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**बारामतीच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन आधुनिक मशीनची आवश्यकता आम्ही सातत्याने मांडली. आदरणीय उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी पवार यांनी तातडीने निर्णय घेत बारामतीला ही सुविधा उपलब्ध करून दिली. ही मशीन म्हणजे केवळ एक यंत्र नसून स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेची हमी आणि आधुनिक, सक्षम बारामतीच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे.**

**– नवनाथ बल्लाळ**
आरोग्य सभापती बारामती नगरपरिषद

**आदरणीय स्वर्गीय अजितदादांनी बारामतीमध्ये स्वच्छतेला नेहमीच सर्वोच्च प्राधान्य दिले. त्याच विचारांचा वारसा पुढे नेत आदरणीय उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी पवार यांनी बारामतीला ही अत्याधुनिक मशीन उपलब्ध करून दिली. यामुळे स्वच्छता कर्मचाऱ्यांची सुरक्षितता वाढेल, कामाची गती वाढेल आणि बारामतीची स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम बनेल.**

**– सचिन सातव**
नगराध्यक्ष, बारामती नगरपरिषद

**स्वच्छता कर्मचाऱ्यांची सुरक्षितता ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून त्यांना सुरक्षित कार्यपरिसर उपलब्ध करून देणे आणि नागरिकांना अधिक दर्जेदार स्वच्छता सेवा देणे, हा शासनाचा प्राधान्यक्रम आहे. बारामतीच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या सुविधांसाठी आवश्यक असलेल्या प्रत्येक बाबतीत शासन सकारात्मक राहील.**

**– सुनेत्रा वहिनी पवार**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

## दिल्ली येथील जंतर-मंतरवरील विद्यार्थ्यांवर मारहाणीचा निषेधार्थ सोमेश्वरमध्ये निषेध

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर :** दिल्ली येथे नीट पेपरफुटी प्रकरणी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या अमानूष लाठीचार्ज मारहाणीचा निषेध सोमेश्वरनगर येथे गुरुवारी पालक, विद्यार्थी, युवक आणि नागरिकांनी एकत्र येत तीव्र निषेधार्थ आंदोलन केले. बारामती तालुक्यातील करंजेपूल मुख्य ते सोमेश्वर सहकारी साखर कारखाना परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापर्यंत मोर्चा काढत आंदोलकांनी केंद्र शासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

'नीट' पेपरफुटीची सखोल द्यावा, चौकशी करा, शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा विद्यार्थ्यांवरील लाठीमाराचा निषेध असो, अशा घोषणांनी परिसर



दणाणून गेला.'इन्कलाब जिंदाबाद' वंदे मातरम, 'भारत माता की जय' अशा घोषणाही आंदोलकांनी दिल्या.

शेकडो विद्यार्थी, युवक आणि नागरिक या आंदोलनात सहभागी झाले होते. ग्रामीण भागातील तरुणाई मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरल्याचे चित्र पाहायला मिळाले. आंदोलकांनी विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे केंद्र शासनाने तातडीने लक्ष द्यावे अशी मागणी केली. आंदोलनानंतर वडगा निंबाळकर पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले.

यावेळी वाघळवाडीचे सरपंच हेमंत गायकवाड, करंजे सरपंच भाऊसाहेब हंबरे, वाघळवाडी सरपंच हेमंत गायकवाड, ड अजिंक्य सावंत,डॉ. सौरभ काकडे, प्रदीप शेंडकर, दिग्विजय मगर, शिवाजी शेंडकर, सुरेश शेंडकर, सुखदेव शिंदे,गणेश शेंडकर,प्रदीप कणसे, शाहजी कोंढाळकर,केतन भोसले, गणेश सावंत, राजू बडदे,योगेश यादव, बंटी गायकवाड, निखिल शेंडकर, दत्तात्रय शेंडकर यांच्यासह विद्यार्थी, युवक आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वढू बुद्रुक मधून खांबांवरील ल्युमिनीयमच्या केबल चोरी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** वढू बुद्रुक (ता. शिरुर) येथील बंधाऱ्या जवळील विद्युत वितरण विभागाच्या खांबांवरील ल्युमिनीयमच्या केबल चोरीला गेल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



वढू बुद्रुक (ता. शिरुर) येथील भीमा नदीवर असलेल्या बंधाऱ्याच्या भागात पूर आल्याने येथील विद्युत वितरण विभागाचे विजेचे पोल जमिनीवर पडले होते.

त्यांनतर पुराचे पाणी कमी झाल्याने विद्युत वितरण विभागाचे कर्मचारी सदर ठिकाणी गेले असता तब्बल पाच खांबांवरील एक लाख रुपये किमतीच्या ल्युमिनीयम धातूच्या केबल चोरीला गेल्याचे दिसून आले, याबाबत सिताराम तुकराम राठोड (वय ३६ वर्षे रा. तुळापुर ता. हवेली जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस करत आहे.

## गायकवाड विद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** कासारी (ता.शिरूर) येथील समता शिक्षण प्रसारक मंडळाच्या हिराबाई गोपाळराव गायकवाड विद्यालयामध्ये स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले . याप्रसंगी अजित दादांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. विद्यालयातील विद्यार्थिनी श्वेता लिंगे हिने अजित दादांबद्दल मनोगत व्यक्त केले. विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना चैत्राली जनरल स्टोअर्सच्या वतीने शालेय उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी शिक्रापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी विद्यार्थ्यांना शिस्त आणि घ्यायची काळजी या संदर्भात मार्गदर्शन केले . विद्यार्थ्यांनी आपल्या तक्रारी न घाबरता आणि कोणत्याही दडपणाखाली न येता वर्गशिक्षक मुख्याध्यापक यांच्यापर्यंत पोहोचवल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे तक्रारपेटीचाही वापर केला पाहिजे असेही प्रतिपादन त्यांनी केले. रहदारीचे नियम पाळणे, दुचाकींचा वापर न करणे या संदर्भातही सुचित केले. यावेळी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत दिंडीचेही आयोजन करण्यात आले होते.

यावेळी राजेंद्र ढमढेरे, दिलीप भुजबळ, तबन भुजबळ, गुलाब सातपुते, दत्तात्रय गिरमकर, संतोष काकडे, चैत्राली जनरल स्टोअर्सचे संचालक संजय नरके, उदय नरके, विद्यालयाच्या प्रभारी मुख्याध्यापिका ज्योत्स्ना दरेकर व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## बालदिंडीने दुमदुमला धावडी-फलकेवाडी परिसर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**डिंबे :** आषाढी एकादशीच्या निमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धावडी व फलकेवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली बालदिंडी भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात संपन्न झाली. ज्ञानेश्वर माऊली, तुकाराम महाराज यांच्या जयघोषाने तसेच अभंग, टाळ आणि मृदंगाच्या निनादाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

बालदिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून सहभाग घेतला. मुलांनी पायजमा-सदरा, तर मुलींनी नववारी साडी परिधान केली होती. प्रत्येकाच्या हातात भगवा ध्वज असून काही विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणीची वेशभूषा साकारून वारकरी परंपरेचे आकर्षक दर्शन घडविले. पालखीत ज्ञानेश्वरी ग्रंथासह विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती आणि तसबीर ठेवण्यात आली होती.दिंडीचा प्रारंभ शाळेतून झाला. त्यानंतर श्री गणेश मंदिर, श्री



राम मंदिर मार्गे संपूर्ण फलकेवाडी गावातून प्रदक्षिणा काढण्यात आली. ज्ञानबा-तुकारामच्या अखंड गजरात, टाळ-मृदंगाच्या साथीने आणि अभंग गायनाने भक्तिमय वातावरण निर्माण झाले. गावातील भजन मंडळांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत दिंडीची शोभा वाढविली.श्री गणेश मंदिरात भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यानंतर आरतीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. उपस्थित विद्यार्थ्यांना चिक्की, बिस्किटे, लाडू आदी प्रसादाचे वाटप करण्यात आले.कार्यक्रमासाठी ह.भ.प. चंद्रकांत फलके, सामाजिक कार्यकर्ते नवनाथ फलके, ग्रामस्थ वसंत फलके, ग्रामस्थ गोविंद कुरणे, ग्रामस्थ भानुदास फलके, ग्रामस्थ भिकाजी काथेर, ग्रामस्थ मारुती फलके, ग्रामस्थ संगिता फलके, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा सुनिता फलके, शिक्षिका वैशाली थोरात, शिक्षक विकास थोरात आणि शिक्षक राजाराम काथेर यांच्यासह ग्रामस्थ, पालक आणि वारकरी बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले. सर्वांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे बालदिंडीला धार्मिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक महत्त्व प्राप्त झाले.

## दगडूशेठ ट्रस्टकडून वारीत लाखो वारकऱ्यांना आरोग्यसेवा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** आषाढी वारी पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेत श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळ यांच्या वतीने यंदाही व्यापक आरोग्यसेवा पुरविण्यात आली. सलग ३७व्या वर्षी राबविण्यात आलेल्या 'जय गणेश रुग्णसेवा अभियान' अंतर्गत संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज आणि संत सोपानदेव महाराज यांच्या पालख्यांसोबत तीन सुसज्ज रुग्णवाहिका, तज्ज्ञ डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी, मोफत औषधोपचार तसेच पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.ज्ञानोबा-तुकारामांच्या नामगजरात विठ्ठल दर्शनासाठी पायी प्रवास करणाऱ्या वारकऱ्यांना संपूर्ण वारीदरम्यान




तसेच प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी आरोग्यसेवा देण्यात आली. पायी चालण्यामुळे उद्भवणारे आजार, थकवा आणि इतर आरोग्यविषयक अडचणी लक्षात घेऊन त्वरित उपचाराची व्यवस्था करण्यात आली होती. याशिवाय विविध ठिकाणी पिण्याच्या पाण्याचे टँकरही उपलब्ध करून देण्यात आले.

या उपक्रमात संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावरील सासवड, जेजुरी, वाल्हे, लोणंद, फलटण, तरडगाव, माळशिरस आणि वाखरी येथे, संत तुकाराम महाराज पालखी मार्गावरील लोणी काळभोर, यवत, बारामती, बेलवाडी, इंदापूर, अकलूज आणि वाखरी येथे, तर संत सोपानदेव महाराज पालखी मार्गावरील सोमेश्वरनगर, बारामती, लासुर्णे, अकलूज, भंडी शेगाव आणि वाखरी येथे वैद्यकीय सेवा पुरविण्यात आली.

पालखी सोहळा ज्या ठिकाणी मुक्कामास असे, त्या प्रत्येक ठिकाणी ट्रस्ट आणि सहयोगी वैद्यकीय संस्थांच्या माध्यमातून फिरता दवाखाना सुरू ठेवण्यात आला. या माध्यमातून त्वचारोग, कान-नाक-घसा, नेत्र तपासणी, रक्तदाब, रक्तातील शर्करा तपासणी आदी विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. आवश्यकतेनुसार मोफत औषधांचेही वाटप करण्यात आले. या सेवेचा लाखो वारकऱ्यांनी लाभ घेतला.ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष डॉ. रामचंद्र परांजपे, उपाध्यक्ष माणिक चव्हाण, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस तथा आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण आणि ट्रस्टचे वैद्यकीय विभाग प्रमुख राजेंद्र परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

ट्रस्टचे उपाध्यक्ष डॉ. रामचंद्र परांजपे यांनी सांगितले की, अनेक किलोमीटर पायी प्रवास करणाऱ्या वारकऱ्यांना वेळेत आणि दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. वारीतील प्रत्येक वारकऱ्याला आवश्यक ते उपचार, तपासणी आणि औषधोपचार विनामूल्य मिळावेत, यासाठी दरवर्षी नियोजनबद्ध पद्धतीने ही सेवा राबविण्यात येते.

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे पती **कै. दत्तात्रय रामचंद्र शिंदे** याचे दि. २९/०९/२०२५ रोजी निधन झाले. त्याच्या नावे पिंपरी-चिंचवड आर.टी.ओ. मध्ये नोंद असलेली दोन गाड्या खालील प्रमाणेः १) TATA कंपनीचे मॉडेल TATA Nexon XM 1.2 RTN BS4 फोर व्हिलर गाडी नं.MH14 GY 7857 **चॅसिज नं.** MAT627221JLG33335 **इंजिन नं.** REVTRN03GRYK70802, **कलर** - CALGARY WHITE , २) Honda कंपनीचे मॉडेल ACTIVA **टु व्हिलर** गाडी नं.MH14 BY 1188 **चॅसिज नं.** ME4JC446K98025947 **इंजिन नं.** JC44E0308078, **कलर** - GREY असा आहे. कायदेशीर वारसदार म्हणून मी माझ्या नावे सदर वाहन हस्तांतर करण्यास उप-प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड कार्यालय यांच्याकडे कागदपत्रे सादर करीत आहे. सदर वाहनासंदर्भात जर कोणाचीही कसलीही तक्रार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांचे आत लेखी स्वरुपात कळवावे. अन्यथा आपल्यापैकी कोणाचीही कसलीही तक्रार नाही. असे गृहित धरुन सदर वाहन मी माझ्या नावे हस्तांतर करुन घेत आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

**श्रीमती सुवर्णा दत्तात्रय शिंदे**
रा.प्रसून धाम अनंत बी-४, सेक्टर ३२/ए, दत्तनगर, थेरगाव, पुणे. ४११ ०३३.
मो. ९५५२५४२३१३

# जंतर-मंतर आंदोलनाच्या समर्थनार्थ शेवगाव बंद

## विद्यार्थ्यांवरील कथित हल्ल्याचा निषेध

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवरील कथित हल्ल्याच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीच्या वतीने गुरुवारी शेवगाव शहर बंदचे आवाहन करण्यात आले. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या निर्देशानुसार पक्षाचे राज्य उपाध्यक्ष प्रा. किसन चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली हा बंद पाळण्यात आला.

या बंदला कॉँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), भारतीय कम्युनिस्ट पक्ष, भारतीय बौद्ध महासभा, स्वाभिमानी शेतकरी संघटना तसेच विविध समविचारी पक्ष व सामाजिक संघटनांनी पाठिंबा दर्शविला. शहरातील लहान-मोठे व्यापारी व व्यावसायिकांनी स्वयंस्फूर्तीने आपली आस्थापने बंद ठेवून आंदोलनाला प्रतिसाद दिला.

आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी विविध घोषणाबाजी केली. तसेच केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात घोषणा देण्यात आल्या. यामुळे काही काळ शहरातील वातावरण आंदोलनमय झाले. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली शेवगाव पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त तैनात केला होता.

यानंतर क्रांती चौक येथे निषेध सभेचे आयोजन करण्यात आले. सभेत वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष प्रा. किसन चव्हाण, अविनाश मगरे, प्रा. विजय हुसळे, बाळासाहेब धस, कॉ. गोरक्ष काकडे, अजिंक्य लव्हाटे तसेच कॉ. दत्ता आरे यांनी मनोगते व्यक्त केली.

प्रा. किसन चव्हाण यांनी आपल्या भाषणात केंद्र सरकारच्या धोरणांवर टीका करताना लोकशाही, संविधान, शिक्षण व्यवस्था, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर सरकार अपयशी ठरल्याचा आरोप केला. देशातील विद्यार्थ्यांचे आंदोलन हे व्यापक जनआंदोलनाचे रूप धारण




करत असल्याचे सांगत त्यांनी सर्व समाजघटकांनी लोकशाही मार्गाने संघर्षात सहभागी होण्याचे आवाहन केले. या आंदोलनात शेख प्यारेलाल, भन्ते धम्मपाल, ऑगस्टिन गजभीव, लक्ष्मण मोरे, संजय लहासे, संतोष पटवेकर, कॉ. बबनराव पवार, शेख सलीम जिलानी, गोरख तुपविहिरे, संदीप घाडगे, अरुण खर्चन, रामभाऊ गुंजाळ, सुरेश खंडागळे, रामभाऊ खंडागळे, दिलीप वाघमारे, अशोक लोढे पाटील, लुकास गजभीव, रवींद्र निळ, रवी जगधने, सोमनाथ भंडारे, राजू जगधने यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# ज्ञानोबा माऊली तुकारामच्या गजरात दुमदुमले वडझिरे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** पारनेर तालुक्यातील वडझिरे येथे पवनपुत्र एज्युकेशन सोसायटी संचलित वडझिरे इंग्लिश मीडियम स्कूलच्या वतीने आयोजित करण्यात आलेला बाल वारकऱ्यांचा पायी दिंडी पालखी सोहळा भक्तिमय वातावरणात आणि उत्साहाच्या जल्लोषात संपन्न झाला. ज्ञानोबा माऊली तुकारामच्या अखंड गजराने संपूर्ण गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले.

हाती भगव्या पताका, टाळ-मृदंगाचा निनाद आणि विठ्ठलनामाचा गजर करत बाल वारकरी उत्स्फूर्तपणे नाचत-गात मार्गक्रमण करत होते. विद्यार्थ्यांनी खांद्यावर पालखी घेत


छायाचित्र : दत्ता गाडगे

पारंपरिक पद्धतीने मिरवणूक काढत वारीची संस्कृती जिवंत केली.

शाळेपासून प्रारंभ झालेला हा पालखी सोहळा गावातून मार्गक्रमण करत गावच्या वेशीजवळील श्री विठ्ठल मंदिरापर्यंत पोहोचला. मंदिर परिसरात विद्यार्थ्यांनी फुगड्या, पाऊली आणि पारंपरिक खेळ सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर ढोल-लेझीमच्या दणदणीत तालावर बाल वारकऱ्यांनी गोल रिंगण साकारत वारीतील भक्ती, शिस्त आणि एकात्मतेचे दर्शन घडविले. ग्रामस्थ व भाविकांनी टाळ्यांच्या कडकडाटात या अनोख्या सोहळ्याला उत्स्फूर्त दाद दिली.

यावेळी प्रशांत वाळुंज यांनी विद्यार्थ्यांना वारीची परंपरा, तिचे सांस्कृतिक आणि आध्यात्मिक महत्त्व समजावून सांगितले. वारी ही केवळ यात्रा नसून माणसातील अहंकार दूर करून दयाभाव, समता आणि मानवतेचे संस्कार रुजविणारी जीवनशाळा आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. तसेच प्रा. जयसिंग लंके, शिक्षकवृंद आणि सर्व सहकाऱ्यांनी राबविलेल्या या उपक्रमाचे त्यांनी विशेष कौतुक करत आभार व्यक्त केले.

भक्ती, संस्कार आणि परंपरेचा सुंदर संगम घडविणारा हा पायी दिंडी पालखी सोहळा विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांच्या मनात कायमची भक्तिमय आठवण निर्माण करून गेला.

# स्वखर्चातून ख्रिश्चन स्मशानभूमीस हायमॅक्स दिव्यांची भेट

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**तिसगाव :** तिसगाव येथील सामाजिक कार्यकर्ते मन्सूर पठाण यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबवत तुळजापूर पेठेतील ख्रिश्चन स्मशानभूमीस स्वखर्चातून हायमॅक्स दिव्यांची सुविधा उपलब्ध करून दिली.स्मशानभूमीत रात्रीच्या वेळी प्रकाशाची कोणतीही व्यवस्था नसल्याचे एका दफनविधी च्या वेळेस त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर वाढदिवसाचा खर्च टाळून त्यांनी स्मशानभूमी परिसरात चार दिव्यांचा पोल तसेच अकरा हायमॅक्स एलईडी दिवे बसवून परिसर उजळून टाकला. या उपक्रमामुळे अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांची मोठी गैरसोय दूर झाली असून ग्रामस्थांनी या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य शिवशंकर राजळे, भाऊसाहेब लोखंडे,मन्सूर पठाण, विक्रम ससाने, नंदकुमार लोखंडे, अक्षय साळवे, सचिन खंडागळे, सतीश साळवे, संजय लवांडे, अरुण पुंड, सुनील लवांडे, वाघमारे मेजर, रंजन साळवे, नितीन लवांडे,अविनाश नरवडे,राजू भुजबळ, शौकत पठाण, दस्तगीर शेख,उमेश अय्या मान्यवर उपस्थित होते.

# भूमिअभिलेख कार्यालयात झेरॉक्सच्या नावाखाली शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक?

## कायदेशीर शुल्क भरूनही पावतीशिवाय झेरॉक्सच्या नावाखाली वसुली!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**चिचोंडी पाटील :** शेतकऱ्यांच्या जमिनीशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रे मिळविण्यासाठी अहिल्यानगर येथील भूमिअभिलेख कार्यालयात येणाऱ्या ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शासनाने निश्चित केलेले कायदेशीर शुल्क भरल्यानंतरही झेरॉक्सच्या नावाखाली अतिरिक्त पैसे मोजावे लागत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे, या रकमेची कोणतीही अधिकृत पावती दिली जात नसल्याने शासकीय कार्यालयातील आर्थिक व्यवहारांच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

**रेकॉर्ड रूमवर सीसीटीव्हीची नजर; मग कर्मचारी कक्षांवर का नाही?**

भूमी अभिलेखा कार्यालयात महत्त्वाच्या रेकॉर्ड रूममध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. मात्र, नागरिकांची कामे ज्या कर्मचारी कक्षांमध्ये होतात, त्या ठिकाणी सीसीटीव्ही व्यवस्था नसल्याचे दिसून येते. त्यामुळे व्यवहारातील पारदर्शकता, जबाबदारी आणि नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण यावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. कर्मचारी कक्षांमध्ये सीसीटीव्ही का बसविण्यात आले नाहीत, याबाबत प्रशासनाने खुलासा करावा, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

तालुक्यातील अनेक गावांमधून शेतकरी नकाशे, मोजणी उतारे आणि इतर भूमिअभिलेख कागदपत्रांसाठी कार्यालयात येतात. आवश्यक शुल्क भरूनही झेरॉक्सच्या नावाखाली रोख रक्कम घेतली जात असल्याचे दिसून येत आहे. मात्र या व्यवहाराची कोणतीही अधिकृत पावती शेतकऱ्यांना दिली जात नसल्याने नेमके कोणत्या नियमांनुसार ही रक्कम आकारली जाते, याबाबत संभ्रमाचे वातावरण आहे. शेतकरी दिवसभराची मजुरी बुडवून, प्रवास खर्च करून आणि वेळ खर्चून कार्यालयात येतात.

# शेवगावांत सागवान लाकडाची अवैध वाहतूक

## वन विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव :** अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यात सागवान लाकडाची अवैध वाहतूक वाढत असल्याची गंभीर बाब समोर येत आहे. रात्रीच्या वेळी तसेच दुर्गम मार्गांचा वापर करून मौल्यवान सागवान लाकूड वाहून नेले जात असल्याच्या तक्रारी असून, ही अवैध वाहतूक रोखण्यात वन विभाग अपयशी ठरत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.




स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, वन विभागाकडून नियमित गस्त (पेट्रोलिंग) होत नसल्याने लाकूड तस्करांचे मनोबल वाढले आहे. जंगल परिसरातील हालचालींवर प्रभावी नियंत्रण नसल्यामुळे अवैधरित्या तोड करण्यात आलेले सागवान लाकूड विविध वाहनांद्वारे इतर भागात नेले जात असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे वनसंपत्तीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून पर्यावरणालाही धोका निर्माण झाला आहे.

**सागवान वाहतुकीसाठी नियम आवश्यक**

वन विभागाच्या नियमानुसार सागवान किंवा अन्य मौल्यवान वनउत्पादनाची वाहतूक करण्यासाठी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याची वैध परवानगी आवश्यक असते. परवानगीशिवाय सागवान लाकूड साठवणे, खरेदी-विक्री करणे किंवा वाहतूक करणे हा वन कायद्यांतर्गत दंडनीय गुन्हा मानला जातो. वाहतुकीदरम्यान संबंधित कागदपत्रे वाहनचालकाकडे असणे बंधनकारक असून, तपासणीदरम्यान ती सादर करावी लागतात. नियमांचे उल्लंघन झाल्यास लाकूड, वाहतूक करणारे वाहन जप्त करण्यासह संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याची तरतूद आहे.

# लेखी आश्वासन मिळाल्याने उपोषण स्थगित



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील मुंगी येथील ग्रामविकासाच्या विविध विभागाच्या अंतर्गत असलेल्या विकास कामाच्या बाबत सुमारे ३३ मागण्यासाठी उपसरपंच वंदना घोटाळे यांच्यासह ग्रामपंचायतीच्या सदस्यांनी व ग्रामस्थानी गावातील भवानीमाता मंदिरामध्ये सुरू केलेले अन्नत्याग उपोषण दुसऱ्या दिवशी लेखी स्वरूपाचे आश्वासन मिळाल्याने स्थगित करण्यात आले असले बाबतची माहिती वंदना घोटाळे यांनी दिली आहे. वीज महावितरण कंपनीच्या अंतर्गत येणाऱ्या विषयाबाबत महावितरणने उपोषणाच्या आदल्या दिवशीच दिलेल्या लेखी पत्र दिले होत.

# प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्वप्नपूर्ती करा : डॉ. राठोड

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित निर्मलाताई काकडे आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगाव येथे प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा 'स्वागत समारंभ' आणि 'करिअर मार्गदर्शन' कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रातील सर्वाधिक पदव्या संपादन करणारे, ३१ पदव्या, ४ पीएचडीधारक आणि राज्य व केंद्र शासनाच्या विशेष सेवा पदकाने सन्मानित पोलीस अधीक्षक डॉ. दत्ताराम राठोड उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. ए. दुकळे होते.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ.



दत्ताराम राठोड म्हणाले की, अत्यंत सामान्य आणि गरीब कुटुंबातून, वाड्या-वस्त्यांवरून शिक्षण घेत असताना जिद्द, चिकाटी व सततच्या प्रयत्नांमुळे कोणतेही अशक्य ध्येय साध्य करता येते.

विद्यार्थ्यांनी केवळ पदवीपुरते मर्यादित न राहता अवांतर वाचन, स्पर्धा परीक्षा आणि संशोधनाकडे लक्ष दिले पाहिजे. त्यांनी आपल्या ३१ पदव्या, ४ पी.एचडी., ६ स्पर्धा परीक्षा आणि नक्षलविरोधी अभियानातील कामगिरीचा प्रवास उलगडून दाखवत विद्यार्थ्यांना उच्च ध्येय बाळगण्याची प्रेरणा दिली. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. पी. ए. दुकळे यांनी नवप्रविष्ट विद्यार्थ्यांचे महाविद्यालयात स्वागत केले.

डॉ. दत्ताराम राठोड यांचा जीवनप्रवास हा सर्वसामान्य कुटुंबातील मुलांसाठी साक्षात प्रेरणेचा स्त्रोत आहे, त्यांच्या या प्रवासातून धडा घेऊन विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक जीवनात उत्तम कामगिरी करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. निकिता बोरुडे यांनी केले. प्रस्तावना प्रा.संतोष निजवे यांनी केली तर आभार डॉ. दादासाहेब जवरे यांनी मानले. कार्यक्रमास सर्व विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तालुका आरोग्य अधिकारी डांगे यांची फिर्याद

## आंदोलनकर्त्यांसह १० ते १५ जणांवर गुन्हा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तालुक्यातील लोणी व्यंकनाथ येथील दोन चिमुकल्या मुलींच्या मृत्यूनंतर उसळलेल्या संतापाला आता कायदेशीर वळण लागले आहे. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शैला डांगे यांच्या फिर्यादीवरून श्रीगोंदा पोलीस ठाण्यात आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्यांसह १० ते १५ जणांविरुद्ध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे तालुक्यात नव्या

**दबावापोटी गुन्हा दाखल केल्याची चर्चा**

तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते टिळक भोस भैय्या वाबळे यांनी नेहमीच जनतेच्या विविध प्रश्नांवर आवाज उठवून प्रशासनाची चांगलीच गळचेपी केल्याचे अनेकदा सर्वांनी पाहिले आहे त्यामुळे प्रशासनाने अदृश्य शक्तीच्या दबावापोटी गुन्हा दाखल केल्याची जोरदार चर्चा रंगताना दिसताना आहे.

वादाला तोंड फुटले असून, ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, २३ जुलै रोजी सकाळी तालुक्यातील लोणी व्यंकनाथ येथील घटनेत उपचारासाठी वेळेत म्बुलन्स न मिळाल्याने आनंदी अनिल कांडेकर (वय ३) व वीरा प्रवीण कांडेकर (वय ३) या दोन चिमुकल्यांचा मृत्यू झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याप्रकरणी डॉ. प्रशांत मुळे आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शैला डांगे यांच्यावर कारवाई व सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी सुरू असतानाच आंदोलनकर्त्यांवर गुन्हा दाखल झाल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.दोन चिमुकल्या मुलींच्या मृत्यूनंतर उसळलेल्या संतापातुन नागरिकांनी लोणी व्यंकनाथ प्राथमिक आरोग्य केंद्रात संतप्त जमावाने प्रवेश करून आरोग्य केंद्राला बाहेरून कुलूप लावले, शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केला तसेच महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. स्नेहल गायकवाड यांना अश्लील व

**मात्र ग्रामस्थांचा सवाल...**

ग्रामस्थांचा आरोप आहे की, दोन निष्पाप बालकांच्या मृत्यूबाबत जबाबदारी निश्चित करण्याऐवजी आंदोलन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यास प्रशासनाने प्राधान्य दिले.दरम्यान, या संपूर्ण प्रकरणामुळे श्रीगोंदा तालुक्यातील आरोग्य यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, या प्रकरणात पुढे प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

धमकीची भाषा वापरल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या प्रकरणी टिळक भोस, स्मितल वाबळे आणि अन्य १० ते १५ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ तसेच महाराष्ट्र वैद्यकीय सेवा व्यक्ती व वैद्यकीय सेवा संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी प्रतिबंध) अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक रसूल शेख करत आहेत.

## द • ख • ल

### बफर स्टॉक युरियाचे वाटप करावे : कोल्हे

**शहरटाकळी :** गेल्या अनेक दिवसापासून पाऊस पडलेला असून अनेक शेतकऱ्याने, कपासी, सोयाबिन, तूर, मुग, उडीद, उस इत्यादी पिके घेतलेली असून शेतकऱ्यांना खताची अत्यंत आवश्यकता आहे. दोन दिवसात बफर स्टॉक असलेला खुला करून शेतकऱ्यांना युरिया खत द्यावे अशी मागणी भाजपा जिल्हा ऊपाध्यक्ष वाय डी कोल्हे यांनी केली आहे.संबंधित विभागांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,शेतकऱ्यांनी, कपासी, सोयाबिन, तूर, मुग, उडीद, उस इत्यादी पिके घेतलेली असून शेतकऱ्यांना खताची अत्यंत आवश्यकता आहे. परंतु खत दुकानदाराकडे शेतकरी गेले असता त्यांना उडवा उडीचे उत्तर दिले जाते. युरिया खताचा बफर स्टॉक आहे. त्यामुळे आम्हाला खते देता येत नाहीत असे उत्तर दिले जातात. जर मोसमात जर शेतीला युरिया सारखे खत मिळाले नाही तर शेतकऱ्याची निराशा होते. परिणामी जे पिक हातातोंडाशी आले आहे ते खता अभावी वाढ न होता ते पिके जाग्यावर खुडते होऊन पिक वाढण्यास मदत होत नाही. वाय डी कोल्हे, अशोक निंबाळकर, रविंद्र मडके वंसत कावले, बाळासाहेब विखे, भास्कर खंडागळे, उत्तम वाबळे, कारभारी वाघ, मोहन खंडागळे, रावसाहेब कोल्हे, यांच्यासह हजारो शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.

### राशीन जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दिंडी सोहळा



**राशीन :** आषाढी एकादशीचे औचित्य साधून राशीन येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पारंपरिक दिंडी सोहळ्याचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा परिधान करून टाळ, मृदंग, वीणा, भगवे ध्वज आणि तुळशी वृंदावनासह ज्ञानोबा-तुकाराम, विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल अशा गजरात दिंडी काढली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापकांसह सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व पटवून दिले. शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या दिंडी सोहळ्याचे पालक व नागरिकांनीही कौतुक केले.

### विद्यार्थ्यांमध्ये शिस्त व संस्कार रुजवणे गरजेचे : सिताराम खिलारी



**टाकळी ढोकेश्वर :** विद्यार्थ्यांमध्ये संत परंपरेचा वारसा,भक्ती,संस्कार, शिस्त,समता आणि सामाजिक ऐक्याची भावना रुजवणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन जिल्हा मराठा संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी पा. यांनी केले. आषाढी एकादशीच्या निमित्ताने भव्य दिंडी सोहळा व पालखी मिरवणूक गावातून काढली होती त्यावेळी बाजारतळावर मार्गदर्शन करताना संस्थेचे सिताराम खिलारी पा. बोलत होते. यावेळी ॲड.रघुनाथ खिलारी, बाळासाहेब खिलारी, बाळासाहेब निवडुंगे सर्व शिक्षक व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तिचे पूजन करण्यात आले. विठ्ठल रुक्मिणी, तुकाराम, ज्ञानदेव इत्यादी पात्र विद्यार्थांनी केले होते.माऊली माऊली या गीतावर विदयार्थ्यांनी गोल रिंगण धरले. पालखी मार्गावर सरपंच बाळासाहेब खिलारी, किरण झावरे, लक्ष्मण झावरे, अशोक वाळुंज, अनिल निवडुंगे, प्रशांत तराळ, संजय मोरे, भानुदास खिलारी,संपत तराळ अतुल सैद, प्रिया डव्हणे, कल्पना जाधव, सुरेखा ठाणगे, वैशाली गायखे, बाबासाहेब जाधव, निलेश जासूद, निलम खिलारी, संदीप महांडुळे, संदीप खिलारी, अशोक गांगड, नितीन ढोकळे, भाऊसाहेब हिंगडे,नारायण शेळके, सोनल रोहकले, सुमन वाळुंज, वर्षा भोंडवे, विष्णू भद्रे, सोनाली माळवदे, मिनाक्षी पवार, पवन कुटे, अनुष्का कांबळे, नारायण हरेल, अमोल गोरे, सुनिता घोडके शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### बालगोपाळांनी जिवंत केला वारकरी संप्रदायाचा समृद्ध वारसा



**शेवगाव :** ज्ञानोबा माऊली तुकाराम...जय जय राम कृष्ण हरी. पांडुरंग हरी..! च्या अखंड जयघोषात आणि टाळ मृदंगाच्या गजरात कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त आयोजित करण्यात आलेली शालेय दिंडी भक्तीमय व उत्साही वातावरणात पार पडली.यावेळी संपूर्ण चापडगाव परिसर टाळ मृदुंगाच्या गजराने आणि हरिनामाच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता.लहानग्या वारकऱ्यांच्या भक्तीने सर्वांनाच मंत्रमुग्ध केले.चिमुकल्या वारकऱ्यांनी साकारलेल्या विविध संत आणि देवतांच्या देखण्या वेशभूषा या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरले. ही परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी शाळा आणि पालकांनी संयुक्तपणे पार पाडली पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. उपमुख्याध्यापक सुनील जायभाये, पर्यवेक्षक संजय दुधाडे, प्राध्यापक, शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद या दिंडीमध्ये सहभागी झाले होते. विद्यालयाचे कलाशिक्षक शितल गोरे सर यांनी सर्व विद्यार्थ्यांची वेशभूषा केली.

### वारकऱ्याची सेवा हीच खरी ईश्वर सेवा : आटकर



**शिराळ चिचोंडी :** वारीतील वारकरी संप्रदायातील वारकऱ्यांची सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे वारीत पायी चालणाऱ्या वारकऱ्यांना छोट्या मोठ्या गरजा पुरवणे यातच खरा परमार्थ आहे विठू नामाचा जयघोष करीत वारकरी हिंदू धर्माची पताका खांद्यावर घेत पंढरपूरकडे मार्गस्थ होताना मिळणारा आनंद हिमालयाच्या उंची समान असल्याचे मिरी तिसगांव प्रादेशिकनळ योजनेचे अध्यक्ष एकनाथ आटकर यांनी केले. यावेळी उपसरपंच आबा गरुड, सोमनाथ पालवे, रावसाहेब कांबळे, संजय शिंदे, नवनाथ पालवे, पिनू भिंगारदिवे, रमेश पाथरकर यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

दैनिक राष्ट्र सह्याद्री



# गोदावरी नदीला महापूर

## पुणतांबा परिसरातील नदीकाठच्या मंदिरांसह रस्ते पाण्याखाली ; प्रशासनाचा सतर्कतेचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** नाशिक जिल्ह्यातील नांदूर मध्यमेश्वर धरण पाणलोट क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे गोदावरी नदीला मोठा पूर आला आहे. गोदावरी नदीपात्रात शुक्रवारी सायंकाळपर्यंत ९४ हजार क्युसेक वेगाने विसर्ग सोडण्यात आला. गेल्या पंधरा दिवसांपूर्वीच गोदावरी दुथडी भरून वाहू लागली होती, त्यातच गुरुवारी सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर झालेल्या जोरदार पावसामुळे नदीच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ झाली आहे.

पावसाचा जोर असाच कायम राहिल्यास विसर्ग आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने गोदावरी नदीकाठावरील सर्व रहिवाशांना सावधानतेचा इशारा दिला आहे. गोदावरीत सोडण्यात आलेला विसर्ग शुक्रवारी सकाळी पुणतांबा येथे पोहोचल्याने वसंत बंधाऱ्याच्या काठाला पाणी लागले आहे. सायंकाळनंतर पुराच्या पाण्यात आणखी वाढ झाल्यास पाणी बंधाऱ्यावरून वाहण्याची शक्यता आहे. बंधाऱ्यावरून ये-जा करणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याने, खबरदारीचा उपाय म्हणून शाळा तात्काळ सोडण्यात आल्या. पुराच्या या पाण्यामुळे नदीकाठचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घाट आणि शनी मंदिराजवळील परिसरातील अनेक छोटी-मोठी मंदिरे पूर्णपणे पाण्याखाली गेली आहेत.पुराच्या पाण्यामुळे परिसरातील वाहतूक पूर्णपणे कोलमडली असून प्रमुख मार्ग बंद करण्यात आले आहेत. एका बाजूला पुराचे संकट ओढवले असतानाच, पुणतांबा आणि परिसरात गेल्या दोन दिवसांपासून रात्रीच्या वेळी पडत असलेल्या रिमझिम व दमदार पावसाने बळीराजाच्या चेहऱ्यावर समाधान आणले आहे. या पावसामुळे परिसरातील खरीप पिकांना जीवदान मिळाले असून मोठा दिलासा मिळाला आहे.

**नाशिक पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊसाने गोदावरी नदीत ९४ हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग सोडण्यात आला आहेत. त्यामुळे पुणतांबा-कोपरगाव (कातनाला पूल) आणि पुणतांबा-शिर्डी रस्त्यांवर पुराचे पाणी आल्याने रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. अहिल्यादेवी होळकर घाट व शनी मंदिराजवळील अनेक मंदिरे पाण्याखाली गेली आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून नदीकाठावरील गावातील शाळा सोडण्यात आल्या आहेत.**





# आरना कुंकुळोळची नेमबाजीच्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी दमदार मजल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



श्रीरामपूर : नॅशनल रायफल असोसिएशन ऑफ इंडिया (NRAI) यांच्या वतीने देहराडून येथील महाराणा प्रताप स्पोर्ट्स कॉलेजमध्ये आयोजित प्रतिष्ठित जसपाल राणा मेमोरियल इंडिया ओपन कॉम्पिटिशन नेमबाजी स्पर्धेत श्रीरामपूरच्या द अल्टीमेट स्पोर्ट्स शूटिंग अकॅडमीची खेळाडू आरना प्रितेश कुंकुळोळ हिने उल्लेखनीय कामगिरी केली. १० मीटर एअर रायफल प्रकारात पहिल्याच प्रयत्नात ३९०.२ गुणांची नोंद करत तिने डिसेंबर २०२६ मध्ये होणाऱ्या राष्ट्रीय अजिंक्यपद नेमबाजी स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. आरनाच्या या यशामागे तिची अथक मेहनत, शिस्तबद्ध सराव, सातत्य आणि खेळावरील निष्ठा असल्याचे सांगितले जात आहे. तिच्या या यशामुळे कुटुंबीय, प्रशिक्षक आणि श्रीरामपूरच्या क्रीडाविश्वाचा अभिमान उंचावला आहे. प्रशिक्षक तथा राष्ट्रीय खेळाडू केतन वाघ यांच्या मार्गदर्शनाचा आणि सातत्यपूर्ण प्रशिक्षणाचा आरनाच्या यशात मोलाचा वाटा असून, तिच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आगामी राष्ट्रीय स्पर्धेसाठी तिला शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंग यांचे सत्पनीक तुळजाभवानीचे दर्शन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तुळजापूर :** ''कवड्याची गळी माळ, करते भक्तांचा संभाळ'' असा जयघोष करत, महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या आई तुळजाभवानीचे मध्यप्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंग यांनी शुक्रवारी सहपरिवार दर्शन घेतले. या आई तुळजाभवानीच्या चरणी नतमस्तक होत त्यांनी राज्यात चांगला पाऊस-पाणी व्हावे आणि शेतकरी राजाचा शिवार सुजलाम सुफलाम होऊन समृद्ध राहावा, अशी मनोभावे प्रार्थना केली. आमदार हेमंत ओगले, निलेश नागले, तुळजापूर देवस्थानचे पदाधिकारी विश्वस्त आदीसह भाविक उपस्थित होते. या महत्त्वपूर्ण धार्मिक भेटीदरम्यान, मंदिर संस्थानच्या वतीने दिग्विजय सिंग यांचा पारंपरिक पद्धतीने सन्मान करण्यात आला. तसेच, देवस्थान ट्रस्टच्या माध्यमातून भाविकांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी उपक्रमांची माहिती त्यांना देण्यात आली. यावेळी स्थानिक प्रशासनाचे अधिकारी आणि तुळजाभवानीचे पुजारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# झरेकाठी शिवारात पुन्हा बिबट्याचा हल्ला, शेळी जखमी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** तालुक्यातील झरेकाठी परिसरात बिबट्याचा वावर आणि दहशत दिवसेंदिवस वाढत चालली असून, ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहेत. अवघ्या दोन दिवसांपूर्वी संदिप वाणी यांच्यावर हल्ला करणाऱ्या बिबट्याने आता त्याच वस्तीवरील शेळ्यांच्या गोठ्यावर पुन्हा हल्ला करत एक शेळी जखमी केल्याची घटना समोर आली आहेत. शुक्रवारी (दि. २४ ) जुलै रोजी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास संपत गेनू वाणी यांच्या झरेकाठी येथील राहत्या घरी (गट नंबर १८२) हा प्रकार घडला. बिबट्याने विटांचे बांधकाम असलेल्या शेळ्यांच्या गोठ्याकडील विटा बाजूला करून आत प्रवेश केला आणि शेळीवर हल्ला केला.



**झरेकाठी : येथे बिबट्याने शेळीवर हल्ला केला. ( छायाचित्र – सोमनाथ डोळे)**

गोठ्यातून शेळ्यांचा मोठा आवाज ऐकून संपत वाणी यांच्या पत्नी, लता वाणी या झोपेतून उठून तात्काळ गोठ्याकडे धावल्या. त्यांनी प्रसंगावधान राखून मोठ्याने आरडाओरडा केल्यामुळे बिबट्याने गोठ्यातून पळ काढला. या हल्ल्यात शेळी जखमी झाली आहे. काही दिवसांपूर्वी याच भागात संदिप वाणी यांच्यावर बिबट्याने हल्ला केला होता. त्या घटनेची तातडीने माहिती दिल्यानंतर वनविभागाने या परिसरात पिंजरा लावला आहे. मात्र, हा पिंजरा वस्तीपासून खूप दूर अंतरावर लावण्यात आल्यामुळे बिबट्या जेरबंद झालेला नाही. सतत होत असलेल्या बिबट्याच्या हल्ल्यांमुळे परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये भीतीचे सावट आहे. या गंभीर घटनेची वनविभागाने तातडीने दखल घेऊन नरभक्षक किंवा मानवास धोकादायक ठरणाऱ्या या बिबट्याचा त्वरित बंदोबस्त करावा, अशी आक्रमक मागणी झरेकाठी येथील ग्रामस्थांनी केली.

# संगमनेरात गोवंशीय मांस तस्करी प्रकरणात मोठी कारवाई

## संघटित गुन्हेगारीत गुन्हा दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** शहर पोलिसांनी गोवंशीय जनावरांच्या मांसाची अवैध वाहतूक करणाऱ्या आरोपींविरुद्ध मोठी कारवाई करत भारतीय न्याय संहिता (बी. एन.एस.) २०२३ मधील कलम १११ (संघटित गुन्हेगारी) लागू केले आहेत. नव्या कायद्यानुसार संगमनेरातील गुन्ह्यात हे कलम लावण्याची कारवाई करण्यात आल्याची माहिती अपर पोलिस अधीक्षक, श्रीरामपूर कार्यालयाकडून देण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २३ जुलै रोजी रात्री संगमनेर-पुणे मार्गावर केलेल्या कारवाईदरम्यान एका छोट्या हत्ती वाहनातून सुमारे ५०० किलो गोवंशीय जनावरांचे मांस जप्त करण्यात आले. या कारवाईत अंदाजे ३ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या प्रकरणात सलीम रियाज कुरेशी व अतिफ उर्फ सोनू रफीक कुरेशी (दोघेही रा. मोगलपुरा, ता. संगमनेर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासादरम्यान दोन्ही आरोपी यापूर्वीही अशाच प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये सहभागी असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांच्यावर संघटित गुन्हेगारीचे कलम लागू करण्यात आले आहे. आरोपी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी संघटित टोळी तयार करून वारंवार बेकायदेशीर गोवंशीय मांस वाहतूक व विक्री करत असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. त्यामुळे भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १११ अंतर्गत गंभीर स्वरूपाची कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणातील एक आरोपी समद जावेद कुरेशी (वय २८) याला अटक करण्यात आली असून, उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. त्यांच्या संदर्भात माहिती असल्यास नागरिकांनी तातडीने पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक एम. सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर शहर पोलिसांनी केली.

# श्रीरामपूर-वैजापूर संपर्क तुटला

## नागमठाण पुलावरून पर्यायी वाहतूक सुरू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**माळवाडगाव :** श्रीरामपूर तालुक्याच्या पूर्व भागातून वाहणाऱ्या गोदावरी नदीवरील कमालपूर आणि खानापूर हे के. टी. वेअर बंधारे पाण्याखाली गेले आहेत. यामुळे वैजापूर आणि श्रीरामपूर तालुक्यातील गावांचा थेट संपर्क तुटला असून, नागरिकांच्या सोयीसाठी नागमठाण पुलावरून पर्यायी वाहतूक सुरू करण्यात आली आहे. गोदावरी नदीला मध्यरात्रीच पुराचे पाणी आल्याने नदीच्या पाणीपातळीत अचानक वाढ झाली. शुक्रवारी सकाळी नदीकाठच्या गावोगावी पूर पाहण्यासाठी आणि परिस्थितीचा अंदाज घेण्यासाठी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. जलसंपदा विभागाच्या वतीने गुरुवारी सकाळीच नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आल्याने संभाव्य अनर्थ टळला व लोक आधीच सावध होते.

कमालपूर बंधाऱ्यावरून बाजाठाण, शनिदेवगाव, हमरापूर, चेंडूफळ आणि नेवरगाव या गावांचा श्रीरामपूर तालुक्याशी दैनंदिन संपर्क असतो. दूध, भाजीपाला पुरवठा, तसेच शिक्षण व विद्यार्थ्यांची मोठी अडचण झाली आहे. विशेष म्हणजे, कमालपूर बंधाऱ्यापेक्षा खानापूर बंधाऱ्याची उंची जास्त असूनही तोदेखील पाण्याखाली गेला आहे.

त्यामुळे या परिसरातील दळणवळण पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. नदीवरील दोन्ही बंधारे पाण्याखाली गेल्यामुळे या परिसरातील चाकरमानी, विद्यार्थी आणि वाहनचालक सध्या नागमठाण-चांदेगाव पुलावरून पर्यायी मार्गाचा वापर करत असून, प्रवाशांनी सुरक्षेच्या दृष्टीने दक्षता बाळगण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# बेलापुरात दारू अड्ड्यावर छापे, तिघांवर कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील बेलापूर येथे स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने गावठी हातभट्टी दारू अड्डयावर छापा १२ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, या प्रकरणी तीन जणांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. यात दोन महिलांचा समावेश आहेत. महेश बाळासाहेब गायकवाड, मंगल कचरू मांजरे, रेणूका सचिन गायकवाड (रा. वडारवाडा बेलापूर ता.श्रीरामपूर ) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत गुप्त बातमीदार मार्फत बेलापूर येथे गावठी हातभट्टी दारू अड्डे व हातभट्टी दारू तयार करत आहेत, अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने त्यांनी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यानी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना सदर ठिकाणी जावून छापा टाकण्याचे आदेश दिल्याने पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सदर ठिकाणी छापा टाकून गावठी हातभट्टी दारू तयार करण्याचे कच्चे रसायन, तयार गावठी हातभट्टी दारू नष्ट केली असून आरोपींविरुद्ध श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात मुंबई दारूबंदी कायदा कलम ६५ ( फ) (क) (ड ) (ई) प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले.

# कोथरूड पोलिसांच्या 'मोक्का' कारवाईला न्यायालयाचा झटका

## जामखेडच्या सागर गवसणेला 'डिफॉल्ट जामीन' मंजूर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** पुण्यातील कोथरूड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुन्ह्यात जामखेड तालुक्यातील सागर सुभाष गवसणे उर्फ मराठा याच्यावर करण्यात आलेल्या 'मोक्का' कारवाईला विशेष न्यायालयाने मोठा झटका दिला आहे. आरोपीविरुद्ध कोणताही ठोस किंवा प्राथमिक पुरावा नसतानाही अत्यंत घाईघाईने ही कठोर कारवाई करण्यात आल्याचा दावा बचाव पक्षाने केला होता. या कारवाईमुळे सागर गवसणे याला गेल्या सुमारे पाच महिन्यांपासून कारागृहात राहावे लागले होते. दरम्यान, या प्रकरणात पोलीस तपासातील अत्यंत गंभीर कायदेशीर त्रुटी समोर आली. कायद्यानुसार निश्चित केलेल्या कायदेशीर मुदतीत तसेच वाढीव कालावधीतही तपास यंत्रणेला आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करता आले नाही. विशेष म्हणजे, खुद्द तपास अधिकाऱ्याने न्यायालयात सादर केलेल्या निवेदनावरूनही आरोपीविरुद्ध चार्जशीट दाखल करण्यासाठी कोणताही प्राथमिक पुरावा उपलब्ध नसल्याचे उघड झाले.

पोलिसांचे हे अपयश आणि आरोपीचा कायदेशीर हक्क लक्षात आणून देत बचाव पक्षाने 'डिफॉल्ट जामीन' मिळण्यासाठी न्यायालयात जोरदार युक्तिवाद केला. पुणे येथील विशेष मोक्का न्यायालयाचे न्या. सुचेता एम. टाकळीकर यांनी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि कागदपत्रे तपासून बचाव पक्षाचा युक्तिवाद पूर्णपणे ग्राह्य धरला. नियमाप्रमाणे निर्धारित वेळेत दोषारोपपत्र दाखल न झाल्यामुळे आरोपीला जामीन मिळण्याचा 'अबाधित वैधानिक अधिकार' प्राप्त होतो, हे स्पष्ट करत न्यायालयाने सागर गवसणे उर्फ मराठा याचा जामीन अर्ज मंजूर केला. या महत्त्वाच्या कायदेशीर लढाईत आरोपीच्यावतीने वकिलांच्या पथकाने प्रभावीपणे बाजू मांडून पोलिसांचा दावा मोडून काढला. यामध्ये ॲड. निखिल कांबळे (मुंबई), ॲड. नकुल लोणकर, ॲड. सुनील कडूसकर, ॲड. ओंकार नाणेकर, ॲड. रविराज धनावडे, ॲड. गौतम तुपिरे, ॲड. प्रसाद पठारे व ॲड. संकेत पोटावळे यांनी काम पाहिले.

# मुळा धरणात पाण्याची मोठी आवक

## साठा ५० टक्क्याच्या पुढे जाण्याचा अंदाज

**राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** अहिल्यानगर जिल्ह्याची जलसंजीवनी समजल्या जाणाऱ्या मुळा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाने रौद्र रूप धारण केले असून काल दुपारी धरणाकडे येणाऱ्या नवीन पाण्याची विक्रमी आवक २२ हजार ४७३ क्युसेकने सुरू होती. कोतुळ कडून येणाऱ्या पाण्यामुळे मुळा नदीला महापूर आला आहे.

काल दुपार नंतर मुळा धरणात येणारी आवक काहीशी कमी झाली. ती सायंकाळी सहा वाजता १५२९१ क्यूसेसने सुरू होती. तरीसुद्धा सायंकाळपर्यंत पाण्याचा साठा ५०% च्या पुढे जाणार असून जलसंपदा विभागाचा पूर नियंत्रण कक्ष सध्या धरणाच्या पाणी पातळीवर व येणाऱ्या पाण्याच्या आवकवर लक्ष देऊन आहे.

जून महिन्यात मुळा धरणाची पातळी अतिशय खालावली होती त्यामुळे पिण्याच्या पाण्याची सुद्धा बिकट अवस्था झाली होती परंतु धरणातील पाणीसाठा आता समाधानकारक झाल्यामुळे पिण्याच्या पाण्याची अडचण काहीशी दूर होण्याचे संकेत आहेत.



**राहुरी शहराचा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा धरणाच्या खालावलेल्या परिस्थितीमुळे एक दिवसाआड करण्यात आला होता परंतु आता मुळा धरणात समाधानकारक पाण्याची आवक सुरू झाल्यामुळे राहुरी शहराचा पाणीपुरवठा पूर्वीसारखाच सुरळीत होणार असून उद्या दिनांक २६ जुलै पासून राहुरी शहराला दररोज पाणीपुरवठा होणार असल्याचे नगर परिषदेचे अध्यक्ष भाऊसाहेब मोरे उपाध्यक्ष गजानन सातभाई गटनेते हर्ष तनपुरे व सर्व नगरसेवक व मुख्याधिकारी हराळे यांनी सांगितले आहे.**

जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील , मुळा पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी पी व्ही पाटील व शाखा अभियंता राजेंद्र पारखे व अन्य कर्मचारी वृंद मुळा धरणात येणाऱ्या पाण्याच्या स्थितीकडे लक्ष

# शिर्डी, शनिशिंगणापूर आणि नाशिक रस्ते विकासाला गती

## ८५०० कोटींच्या १६ प्रकल्पांना मंजुरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** आगामी नाशिक कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर शिर्डी, शनिशिंगणापूर आणि नाशिक या प्रमुख धार्मिक पर्यटन स्थळांना जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्गांच्या विकासासाठी केंद्र सरकारने ८,५०० कोटी रुपये खर्चाच्या १६ राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी लोकसभेत उपस्थित केलेल्या अतारांकित प्रश्नाला केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी हे महत्त्वपूर्ण उत्तर दिले. कुंभमेळ्याच्या तयारीसाठी राष्ट्रीय महामार्गांच्या विकासाकरिता ८,५०० कोटी रुपयांच्या १६ प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. यात वाढती वाहतूक, भाविकांची होणारी गैरसोय आणि रस्त्यांची दयनीय अवस्था याबाबत लोकसभेत लक्ष वेधले, हे १६ प्रकल्प विविध टप्प्यांत कार्यान्वित असून यामुळे भाविक, पर्यटक आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे स्पष्ट केले.खासदार वाकचौरे यांनी संसदेत खालील महत्त्वाची कामे मार्गी लावण्यासाठी विशेष कालबद्ध कृती आराखड्याची मागणी केली होती यात वडेगाव - शनिशिंगणापूर रस्ता विकास, खडका फाटा ते खामगाव मार्गाचे बांधकाम,गोदावरी नदीवरील बहिरवाडी-खाला किमरी पूल उभारणी,केंद्रीय रस्ता निधी अंतर्गत या कामांना तातडीची मंजुरी तसेच केंद्रीय मंत्र्यांनी स्पष्ट केले की, वरील रस्ते व पूल हे 'जिल्हा रस्त्यांच्या' कार्यक्षेत्रात येत असल्याने त्यांचा विकास व देखभाल ही महाराष्ट्र शासनाची जबाबदारी आहे. योजनेअंतर्गत राज्य शासनाने प्राधान्याने प्रस्ताव पाठवल्यास नियमानुसार विचार केला जाईल, परंतु अद्याप महाराष्ट्र शासनाकडून केंद्राकडे कोणताही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

''नाशिक कुंभमेळा हा जागतिक पातळीवरील धार्मिक सोहळा असून लाखो भाविक शिर्डी, शनिशिंगणापूर व नाशिकला भेट देतात. त्यामुळे सुरक्षित व आधुनिक रस्ते आवश्यक आहेत. केंद्र सरकारने राष्ट्रीय महामार्गासाठी निधी मंजूर केल्याबद्दल समाधान आहे; मात्र जिल्हा रस्ते व पुलांसाठी महाराष्ट्र शासनाने तातडीने प्रस्ताव केंद्राकडे पाठवावेत, यासाठी मी सतत पाठपुरावा करणार असून सर्व विकासकामे लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी कटीबद्ध आहे.''

**भाऊसाहेब वाकचौरे**
**खासदार शिर्डी लोकसभा मतदार संघ**